रायगड, सोमवार दि. ११ डिसेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

शिवभक्तांना रायगड प्रदक्षिणेचे वेध

पान ३ वर

महिला खेळाडू मालामाल

पान ८ वर

आजचा अग्रलेख
उरात रुतलेला काटा

देवेंद्र फूट पाडताहेत

जरांगे-पाटलांचा आरोप

। निलंगा । वृत्तसंस्था ।

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत असणारे काही राज्यातील नेते वेगवेगळी विधाने करून गैरसमज पसरवत आहेत. त्यांना पुढे करून फडणवीसच समाजात फूट पाडत आहेत असा आरोप मनोज जरांगे-पाटील यांनी केला.निलंगा येथील जाहीर सभा आटोपल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर द्यायची गरज नाही. ते कामातून गेले आहेत.त्यांना गोळ्या देण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. फडणवीस मराठ्यांच्या अंगावर किती मराठे घालणार आहेत. आम्ही शांत आहोत आम्हाला शांत राहू द्या.तुमच्या डोक्यातील विषारी विचार मराठ्यांच्या डोक्यात उतरवू नका.कितीही तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी गावगाड्यातील मराठा व ओबीसी सामाजाने एकत्र नांदायचे ठरवले आहे. मराठा समाजावर बोलणाऱ्या नेत्यांना सांगूनही काही जण बरळत आहेत. ते त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी बरळत आहेत असेही जरांगे म्हणाले.

सभागृहात मराठा आरक्षणावर चर्चा : सामंत

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हिवाळी अधिवेशनादरम्यान सभागृहात चर्चा करण्याची मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे यावर सभागृहात चर्चा करण्यासाठी सरकारची देखील तयारी असल्याचे पाहायला मिळत आहे. सोमवारी किंवा मंगळवारी सभागृहात मराठा आरक्षणाच्या मुद्यावर चर्चा होणार असल्याची माहिती उदय सामंत यांनी रत्नागिरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे यांना भेटलो होतो, त्यावेळी मराठा आरक्षणाबाबत सभागृहात चर्चा होईल असे आश्वासन त्यांना दिले होते. त्यामुळे ती चर्चा सोमवारी किंवा मंगळवारी सभागृहात होणार आहे. मराठा समाजाच्या, आरक्षणाच्या निमित्ताने ही चर्चा होणार आहे.

जातनिहाय जनगणना घोषित करा : यशोमती ठाकूर

आगामी निवडणुकांच्या तोंडावर मराठा समाजाला तात्पुरता दिलासा देण्यासाठी हे सरकार घाईघाईत केवळ मराठा आणि ओबीसी समाजाचे सर्वेक्षण करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगावर दबाव आणत आहे. राज्य सरकारच्या या दडपशाही विरोधात अर्धन्यायिक अधिकार असलेल्या या संवैधानिक संस्थेच्या सदस्यांनी राजीनामे दिले आहेत. वास्तविक जातनिहाय जनगणना हाच राज्यात निर्माण झालेल्या आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा आहे. त्यामुळे सरकारने जातनिहाय जनगणना घोषित करावी, अशी मागणी काँग्रेसच्या आमदार यशोमती ठाकूर यांनी केली आहे.

राज्य सरकारचे डोके ठिकाणावर नाही. या सरकारला जातीजातींमध्ये भांडण लावायचे आहे. जातनिहाय जनगणना या प्रश्नासंदर्भात सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पान २ वर

‘शिवशाही’ जळून खाक

२५ प्रवासी बचावले

। नाशिक । वृत्तसंस्था ।

निफाड तालुक्यातील चांदोरी जवळील शिंपी टाकळी फाटा येथे नाशिक ते छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर रविवारी बसला आग लागली.

शिवशाही बस नाशिकहून छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना, इंजिनच्या बाजूने धूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. वाहकाने तत्काळ सदरची बस थांबवून २५ प्रवासी खाली उतरवले. त्यानंतर काही क्षणातच बसने पेट घेतला. या आगीत बस संपूर्ण जळून खाक झाली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा शिवशाही बसच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होत आहे. अग्निशामक दलाकडून आग विझवण्यात आली: सदरच्या घटनेमुळे नाशिक ते छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर वाहतूक ठप्प झाली होती. चांदोरी येथील आपत्ती व्यवस्थापन पथकातील जवान, आपत्ती व्यवस्थापन समिती अध्यक्ष सागर गडाख, सोमनाथ कोटमे, भाऊ कर्डिले, किरण वाघ यांच्यासह स्थानिक नागरिकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. काही वेळातच अग्निशामक दलाकडून आग विझवण्यात आली. चालकाने दाखवलेल्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची चर्चा परिसरात सुरू होती.

वे|ध|क

कंटेनर अपघातात चालकाचा मृत्यू

नेरळ : मुरबाड कर्जत महामार्गावर चाहूचीवाडी येथे कंटेनर दरीत कोसळून अपघात झाला. अपघातात कंटेनर चालकाचा मृत्यू झाला आहे. संजय जाधव असे चालकाचे नाव आहे. सातारा जिल्ह्यातील रहिवाशी असलेले संजय शंकर जाधव हे मुरबाड येथून कर्जतकडे कंटेनर घेऊन निघाले होते.कर्जत तालुक्यातील चाहूची वाडी येथील एका तीव्र उतारावरील वळणावर कंटेनर चालकाचा वेगावरील ताबा सुटून कंटेनर दरीत कोसळला. कंटेनर दरीमध्ये कोसळल्यानंतर स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली.कंटेनर खोल दरीत कोसळल्याने मदत कार्यात अडथळे येत होते. नेरळ पोलीस कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी प्रयत्न केले.

वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

माणगाव : मुंबई गोवा महामार्गावर माणगावनजीकच्या तळेगाव येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. सदरची घटना रविवार १० डिसेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. तेजस म्हस्के यांचा चुलत भाऊ सूर्यकांत म्हस्के हा त्याच्या ताब्यातील दुचाकी घेऊन लोणेरेकडून मुगवलीकडे जात असताना तळेगाव येथे आल्यावर अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक देऊन अपघात केला. सूर्यकांत म्हस्के याच्या डोक्यास, पायास गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. गोरेगाव पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छत्तीसगडच्या मुख्यमंत्रीपदी विष्णू देव साय

छत्तीसगड : भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री विष्णू देव साय यांची छत्तीसगडच्या मुख्यमंत्रीपदासाठी निवड करण्यात आली आहे. रविवारी भाजपाच्या बैठकीत साय यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ३ डिसेंबर रोजी चार राज्याच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल लागला. त्यात भाजपाने तीन राज्यात बहुमताने विजय मिळविला. तरीही तीनही राज्यातील मुख्यमंत्री निवडण्यासाठी उशीर होत होता. अखेर सात दिवसांनी छत्तीसगडला नवा मुख्यमंत्री मिळत आहे. माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ. रमण सिंह यांना आता भाजपाने बाजूला केल्याचे स्पष्ट होत आहे.

श्रीवर्धन रस्त्यांचे रुंदीकरण करावे

माजी आ. पंडित पाटील यांची सरकारकडे मागणी

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धनला रानवली धरणामार्फत पाणी घेतले आहे. त्या धरणाचा पाणीसाठा कमी आहे. पाणीसाठा वाढवण्यासाठी धरणातील गाळ काढून खोली वाढवायला हवी . सरकार ते करणार नसेल तर अन्य ठिकाणाहून पाण्याचा स्त्रोत उपलब्ध करून श्रीवर्धनकरांना पाणीपुरवठा करण्यात यावा. शहराला अरुंद रस्त्यांच्या समस्येने ग्रासले आहे. वाहतुकीची अडचण लक्षात घेऊन शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात यावे किंवा शहरातून बाहेर ये - जा करण्यासाठी पर्यायी मार्ग तयार करावा अशी मागणी सरकारकडे करणार असल्याचे माजी आमदार पंडित पाटील म्हणाले.

श्रीवर्धन पर्यटन क्षेत्र असल्यामुळे येथे पर्यटक वाढले. परंतु शहराचे मुख्य रस्ते अरुंद आहेत.त्या रस्त्यांचे रुंदीकरण होणे गरजेचे आहे.पर्यटकांच्या गाड्या गावात आल्यावर स्थानिकांना त्रास होतो.मोठी वाहने आल्यावर त्यांना श्रीवर्धन बसस्थानकाजवळ गाड्या उभ्या करून पुढे जावे लागते. त्यामुळे सरकारने श्रीवर्धनसाठी विकासात्मक आराखड्याचे नियोजन करावे. असे पंडित पाटील म्हणाले.

महेश्वर आळी ते जीवनाबंदर जेट्टी पर्यतच्या खड्डेमय रस्त्यांबाबत पंडित पाटील यांनी लक्ष वेधून घेताना सांगितले की,या दीड किलोमीटरच्या परिसरात अनेक हॉटेल्स आहेत. जीवनाबंदर तसेच समुद्र किनाऱ्यावर पर्यटक फिरायला जातात. खड्डेमय रस्त्यांनी व उघड्या गटारांनी स्थानिक व पर्यटक त्रस्त झाला आहे. रस्त्याला नगरपरिषद प्रशासनाने उपलब्ध झालेल्या निधीमधून निधी द्यावा. रस्ता,भूमिगत गटारे तयार करावीत .रायगड जिल्हात सर्वाधिक निधी हा श्रीवर्धन नगरपरिषदेला मिळतो. मूलभूत समस्यांवर खर्च करायला पाहिजे पण तिथे खर्च होत नाही. असे पंडित पाटील यांनी नमूद केले.

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक एक येथील पटांगणात शाळेच्या इमारतीला लागूनच दोन वृक्ष आहेत.इमारतीच्या बाजूला असलेले वृक्ष इमारतींवर पडून शासकीय मालमत्तेचे नुकसान होते. याबाबत मुख्याधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. प्रशासनाने नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी गंभीर दखल घ्यायला हवी. श्रीवर्धन समुद्रालगत असल्याने वादळाचा धोका कायम आहे. यामुळे तातडीने हे वृक्ष बाजूला कायाला हवेत असे पंडित पाटील म्हणाले.

‘जत्रा वरसोलीची’

(छायाचित्र : समीर मालोदे)

वरसोली येथील विठ्ठल रखुमाई मंदिर परिसरात यात्रा भरली आहे. रात्री यात्रेचे दिसणारे विहंगम दृश्य

आंबा संरक्षणासाठी ‘कृती दल’

कृती दलात तज्ज्ञ मार्गदर्शकांचा समावेश

। रायगड । प्रतिनिधी ।

अवकाळी पाऊस, वादळी वारे, गारपीट, आंबा बागांमध्ये होणारा तुडतुडे, मिजमाशी, फुलकिडीचा प्रादुर्भाव वेळेतच रोखता यावा, याकरिता कोकणातील आंबा पिकासाठी कार्य दलाची निर्मिती करण्यात आली आहे. आंबा पिकावर येणारी संकटे वेळेत रोखण्यासाठी संशोधन करण्याची मुख्य जबाबदारी कृती दलाची असेल. आठ सदस्यीय समितीत दापोली कृषी विद्यापिठाचे तज्ज्ञ मार्गदर्शकांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोकणातील अधिकाऱ्यांबरोबरच तत्काळ बैठक घेत कृती दल स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थापन झालेल्या समितीमुळे कोकणातील शेतकऱ्यांना

दिलासा मिळाला आहे. द्राक्ष, ऊस पिकाच्या संरक्षणासाठी कृती दल आहे. मात्र कोकणातील आंबा पिकासाठी आतापर्यंत असे कृती दल कार्यान्वित नव्हते. कोकणात सातत्याने आंबा पिकावर संकट येत आहेत. त्यामुळे आंबा पीक घ्यावे की नाही, या विवंचनेत जिल्ह्यातील आंबा उत्पादक आहे.

अवकाळी पावसाने जिल्ह्यातील आंबा उत्पादकांचे यावर्षीही अवकाळीने चिंता वाढवली आहे. लांबलेली थंडी, ढगाळ वातावरण आणि किडीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज होती. जिल्ह्यात घाटमाथ्याच्या पायथ्याशी असलेला पूर्वपट्टा व समुद्रकिनाऱ्यालगतचा पश्चिमपट्टा असे दोन भाग पडतात. साधारण फेब्रुवारी, मार्चपर्यंत किनारपट्टीचे श्रीवर्धन, म्हसळा, मुरूड, अलिबाग या समुद्रीपट्ट्यात आणि नजीकचा भागात आंबा पीक येते; तर पूर्वपट्ट्यातील महाड, पोलादपूर, सुधागड- पाली, कर्जत, खालापूर या तालुक्यांतील अनेक गावांमध्ये शेकडो हेक्टर आंबा लागवड केली जाते. या भागातील आंबा हंगाम पश्चिम भागापेक्षा महिना-दीड महिन्याने उशिराने सुरू होतो. या भागातील आंबा हंगाम सुरू होऊन तो मेअखेरपर्यंत चालतो. याच कालावधीत चाकरमानी गावी आल्यामुळे आंब्याची आवकही वाढते. त्यामुळे येथील आंबा उत्पादकांना पान २ वर

> कृती दल संपूर्ण कोकणात कार्यरत आहे. वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांवर सखोल संशोधन करून ते शेतकऱ्यांसाठी उपलब्ध केले जाणार आहे. यापूर्वी अशी व्यवस्था नव्हती. परंतु काही वर्षांपासून आंबा पिकावर येणाऱ्या संकटांचा विचार करून अशी व्यवस्था असावी, अशी मागणी केली जात होती. भविष्यातील संकटांचा सामना करण्यासाठी कृती दलाचे मार्गदर्शन शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल.
> - उज्ज्वला बाणखेले, जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी

न्याय्य मागण्यांसाठी नागपूरमध्ये मोर्चा

। उरण । प्रतिनिधी ।

वयाच्या ६० वर्षापर्यंत नोकरीत संरक्षण, तिन्ही कंपन्यांमधील भरती प्रक्रियेमध्ये आरक्षण, कंत्राटदारांवर कारवाई अशा आश्वासनांपैकी कोणत्याही बाबतीत ठोस कार्यवाही अद्यापपर्यंत सुरू झाली नाही. त्यामुळे कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ ११ डिसेंबर रोजी नागपूरातील चाचा नेहरू पार्कपासून विधानसभेपर्यंत लक्षवेधी मोर्चा काढणार आहे. यामध्ये न्याय न मिळाल्यास उर्जामंत्र्यांच्या निवासस्थानी मोर्चा वळवला जाणार आहे. असे संघांचे अध्यक्ष निलेश खरात यांनी सांगितले.

दत्त मंदिरातील चोरीचा तपास लागेना

पोलिसांच्या तपासाबाबत भक्तांकडून नाराजी

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरामध्ये अज्ञात चोरट्यांनी १७ डिसेंबर २०२२ रोजी चोरी करुन मूर्तींच्या मागे लावलेली सुमारे ४० किलो चांदी लंपास केली होती. ११ डिसेंबरला येथील यात्रा संपल्यानंतर ही चोरी झाली होती. या चोरीचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले असून, तपासासाठी रायगड जिल्हा पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक तयार करण्यात आले आहे. परंतु, वर्षभराचा कालावधी उलटूनही चोरीचा तपास लावण्यात पोलिसांना अपयश आल्याने दत्तभक्तांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

> या चोरीतील आरोपींना पकडणे आमच्यासाठी एक आव्हान आहे. आतापर्यंत अनेक ठिकाणच्या मंदिरांतील चोरीतील आरोपी पकडले आहेत. वडखळ येथील मंदिरातही अशाच प्रकारे चोरी झाली होती. त्या आरोपीची कसून चौकशी केली. परंतु, त्याने ही चोरी केल्याचे कबुल नव्हते केले. आमचा तपास चालू आहे. अद्यापपर्यंत काहीच धागेदोरे हाती लागलेले नाहीत.
> - बाळासाहेब खाडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, अलिबाग

रायगड जिल्ह्यातील मंदिरांतील दानपेट्या फोडून पैसे, पान २ वर

> चोरटे सीसीटीव्हीमध्ये कैद झालेले असतानाही ते सापडत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. चोरीचा तपास कुठपर्यंत आहे, याबद्दल मी वेळोवेळी पोलीस अधीक्षक, स्थानिक पोलिसांशी बोललोय. परंतु, ते प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे सांगून वेळ मारुन नेण्याचे काम करीत आहेत. हे पोलिसांचे अपयश आहे. याच चोरांनी चिपळूण, संगमेश्वराला चोरी केली असावी, परंतु, ते येथील पोलिसांच्या हाती लागले नाहीत, असे पोलिसांचे म्हणणे आहे. परंतु, दुसऱ्या ठिकाणची कारणे सांगून स्वतःचे अपयश दुसऱ्यांवर ढकलण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. पोलिसांचा हलगर्जीपणा समोर आला असून, त्यांना चोरीचे गांभीर्यच नाही, असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते.
> - सुरेंद्र म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

१८ कोटी ६८ लाख ६३ हजार ३१ रुपयांची वसुली

लोक अदालतीमध्ये २४,४७६ प्रकरणे निकाली

। अलिबाग । वार्ताहर ।

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने शनिवारी लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली. वादपूर्व व दाखल अशी एकूण २४ हजार ४७६ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन नऊ डिसेंबर रोजी करण्यात आले. त्यामध्ये ८२ हजार ,४६५ वादपूर्व प्रकरणे व १२ हजार २८ प्रलंबित अशी एकूण ९४ हजा ४९३ प्रकरणे त्यामध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी २३ हजार ८७ वादपूर्व प्रकरणे व एक हजार ३८९ प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने मिटवून निकाली काढण्यात आली,अशी एकूण २४,४७६ प्रकरणे सामंजस्याने मिटवून निकाली निघाली असून त्याद्वारे पक्षकारांना एकूण १८,६८,६३,०३१ रुपयाची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

रायगड जिल्हयातील विविध न्यायालयात २७ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. यामध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करुनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली. लोक न्यायालय यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक, रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

नऊ जोडप्यांचा संसार जुळला

रायगड जिल्ह्यातील लोकन्यायालयात ९ जोडप्यांचा (पाली १, रोहा ४, महाड ३. पेण १) सामंजस्याने वाद मिटवण्यात आला. त्यात पालीमधील एक , रोहामधील चार , महाडमधील तीन व पेणमधील एक जोडप्यांचा समावेश असून त्यांचा संसार सुरळीत झाला आहे.

मोटार अपघात प्रकरणांमध्ये ४ कोटीची भरपाई

जिल्ह्यामध्ये एकूण ७६ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना ४, कोटी २३, लाख २७ हजार रुपये इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

पर्यटकांना फ्लेमिंगो बोटिंग सफारीची प्रतीक्षा

। पनवेल । प्रतिनिधी ।

दरवर्षी हिवाळा ऋतूमध्ये ऑक्टोबरअखेरीस व नोव्हेंबर ते डिसेंबरपर्यंत फ्लेमिंगो पक्षांचे मोठ्या प्रमाणात आगमन होत असते. त्यांचा अधिवास जवळपास तीन ते चार महिन्यांचा असतो. मात्र, यंदा नोव्हेंबरमध्येदेखील अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे नवी मुंबई शहरात फ्लेमिंगोंचे स्थलांतर होण्यास उशिरा सुरुवात झाली आहे. फ्लेमिंगो मोठ्या प्रमाणात न आल्यामुळे कांदळवन कक्षांकडून सुरू असणारी बोटिंग सफारी अद्यापपर्यंत सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे पर्यटक फ्लेमिंगो बोट सफारीच्या प्रतीक्षेत आहेत.



फ्लेमिंगो म्हणजेच रोहित पक्षी हे इराण, अफगाणिस्तान आणि इस्त्रायलम धून भारतातील विविध पाणथळ क्षेत्रात हिवाळ्यादरम्यान येत असतात. गुजरातच्या कच्छमधून हजारो किलोमीटरचा प्रवास करून हे परदेशी पक्षी समुद्रकिनारी किंवा पाणथळ भागात येत असतात. तसेच नोव्हेंबर ते जास्तीत जास्त जून महिन्यापर्यंत ते वास्तव्यास असतात. त्यांचा मुक्काम कच्छव्यतिरिक्त माहूल-शिवडी, नवी मुंबईत असतो. ऑक्टोबरअखेरीस किंवा नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच फ्लेमिंगो आगमनाची सुरुवात होते. मात्र, ऑक्टोबरपर्यंत मान्सून लांबला होता. नवी मुंबई शहरात म्हणावी तशी थंडीची चाहूल लागली नाही. त्यामुळे पक्षीप्रेमी फ्लेमिंगो अधिवासाच्या प्रतीक्षेत आहे. नवी मुंबई शहरात नेरूळ, उरण तसेच ऐरोली-ठाणे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर फ्लेमिंगोचे दर्शन होत असते.

नाताळाच्या सुट्टीची पर्वणी

ऐरोली येथील सागरी जैवविविधता केंद्रात विशेषतः या परदेशी पाहुण्यांना जवळून पाहता यावे याकरिता बोटिंग सफर सुरू असते. मात्र, अद्याप त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात परदेशी पाहुण्यांचे आगमन झाले नसल्याने ही बोटिंग सफारी सुरू करण्यात आलेली नाही. दिवाळीच्या सुट्टीत पर्यटकांना बोटिंग सफारी मिळाली नाही. आता नाताळच्या सुट्टीत तरी बोटिंग सफारी सुरू होईल का? याचे वेध पर्यटकांना लागले आहेत.

> **रोहित पक्ष्यांचे अद्यापपर्यंत ठाणे खाडीपरिसरात आगमन न झाल्यामुळे बोटिंग सुरू करण्यात आलेली नाही. ज्यावेळी मोठ्या प्रमाणात पक्षी येण्यास सुरुवात होईल त्या वेळी बोटिंग सुरू करण्यात येईल. यंदा परतीच्या पावसामुळे फ्लेमिंगो येण्यास विलंब झाला आहे.**
> **प्रशांत बहादुरे, वनपरिक्षेत्र आधिकारी**

चौल ग्रामपंचायतीत आधार लिंक शिबीर

। रेवदंडा । वार्ताहर ।

चौल ग्रामपंचायतीत ग्रामस्थांच्या सुविधेसाठी भारत गॅस कार्ड धारकांना आधार लिंक जोडण्यासाठी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या आधार लिंक लाभार्थी ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद या शिबीरास दिला.

चौल ग्रामपंचायतीच्या सभागृहात या आधार लिंक शिबीराचे आयोजन भारत गॅसच्या कर्मचारी वर्गाच्या सहकार्याने करण्यात आले होते. चौल ग्रामपंचायतीच्या स्तुत्य उपक्रमाने भारत गॅस कार्डधारक चौल ग्रामस्थांना अलिबाग येथे न जाता, चौल ग्रामपंचायतीच्या सभागृहा मध्ये आधार लिंक जोडून मिळाली त्यामुळे ग्रामस्थांचे वेळ, श्रम व पैसा या तिन्ही बाबींचा फायदा मिळाला.

सकाळी दहा वाजता या शिबिरास शिवसेना उध्दव ठाकरे गट जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, सरपंच प्रतिभा पवार, उपसरपंच अजीत गुरव, ग्रा.प.सदस्या रूपाली म्हात्रे यांचे उपस्थितीत प्रारंभ झाला. सायकांळी पाच वाजेपर्यंत या शिबीराचा लाभ मोठया संख्येने चौल ग्रामस्थांनी भारत गॅस कार्ड धारकांनी आधारकार्ड लिंक करून घेतले. चौलमधील लाभार्थी भारत गॅस कार्डधारकांनी चौल ग्रामपंचायतीने राबविलेल्या स्तुत्य उपक्रमास विशेष धन्यवाद दिले. चौल ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग यांनी सुध्दा विशेष सहकार्य या उपक्रमास दिले.

जासईकरांच्या आंदोलनापुढे सिडको झुकली

ग्रामस्थांना इरादापत्र वाटप; तीन वर्षानंतर लढ्याला यश

। उरण । वार्ताहर ।

जासई ग्रामस्थांची जमीन सिडकोने संपादित करूनही त्यांना विकसित भूखंड देण्यास टाळाटाळ केली जात होती. त्या विरोधात ग्राम स्थांनी आंदोलन केले होते. जोपर्यंत भूखंडाचे इरादापत्र वाटप होत नाही, तोपर्यंत रेल्वेचे उद्घाटन होऊन देणार नाही असा आक्रमक पवित्रा घेतला होता. ग्रामस्थांच्या आंदोलनापुढे सिडकोला झुकावे लागले. यशस्वी लढ्यानंतर सिडकोने ग्रामस्थांना इरादापत्र वाटप केले आहे. हा शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय असल्याचे सरपंच संतोष घरत यांनी सांगितले.

संविधानाचे पुस्तक देऊन गौरव

पनवेल : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टी रायगड जिल्ह्यातर्फे महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून संविधानाचे पुस्तक देऊन नुकतेच गौरविण्यात आले. स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टी रायगड जिल्ह्याला वेळोवेळी मदत करणारे राजू पाटील यांना रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे अरुण जाधव, अरुण धीवर यांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून संविधानाचे पुस्तक देऊन गौरविण्यात आले.

मेसेज पाठविणाऱ्या विरोधात गुन्हा

पनवेल : मेलवरून पत्नीचे अर्धनग्न व इतर फोटो पाठवून कुटुंबाला त्रास देण्याच्या उद्देशाने धमकीचे मेसेज पाठवणाऱ्या अज्ञाताविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर येथे राहणारे ३९ वर्षीय फिर्यादी यांना पहाटे पाचच्या सुमारास त्यांच्या मेल आयडीवर एका अनोळखी इसमाने त्यांच्या पत्नीचे अर्धनग्न फोटो पाठवले. दरम्यान, फिर्यादीने त्यांच्या पत्नीला याबाबत विचारले असता तिने असे फोटो काढले नसल्याचे सांगितले. याबाबत फिर्यादीला मेल आयडीवर तुमच्या पत्नीची उद्या ड्रायव्हिंग लायसन टेस्ट असून ती रद्द करा, नाहीतर पश्चाताप होईल, असा संदेश पाठवण्यात आला. याप्रकरणी फिर्यादीने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील तपास खारघर पोलीस करत आहेत.

कमी कालावधीचे कौशल्य विकास अभ्यासक्रम

श्रेयांक हे पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमांसाठीही वापरणे शक्य

। मुंबई । वृत्तसंस्था ।

पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम हीच ओळख असलेल्या देशभरातील महाविद्यालयांना आता कमी कालावधीचे कौशल्य विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रमही सुरू करता येणार आहेत. हे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचे श्रेयांक हे पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमांसाठीही वापरता येणार आहेत.

पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे, पदविकेचे शिक्षण देणाऱ्या संस्था अशी महाविद्यालयांची ओळख आहे. छोट्या कालावधीचे, रोजगाराभिमुख, कौशल्य विकसित

कोणते अभ्यासक्रम सुरू करता येणार?

कृत्रिम प्रज्ञा, मशिन लर्निंग, आयओटी, विदा विज्ञान, क्लाऊड कॉम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डिजिटल फॉरेन्सिक, व्हर्च्युअल रिअ्लिटी, ५जी कनेक्टिव्हीटी, डिजिटल फ्लुएन्सी, इंडस्ट्रीअल ऑटोमेशन, इलेक्ट्रॉनिक सिस्टीम डिझाईन, बेसिक कोड इन कॉम्प्युटर लॅन्वेज, कॉम्प्युटर एडेड डिझाईन, आहारशास्त्र, व्यायामशास्त्र, फायनान्शिअल टेक्नॉलॉजी, फॅशन टेक्नॉलॉजी, फॅशन डिझायनिंग, योगविज्ञान, सॉफ्ट स्किल्स, बेसिक ऑफ स्टार्टअप, व्यवस्थापन, सोहळा व्यवस्थापन, विपणन याशिवाय संस्था विद्यार्थ्यांना मिळणारे ज्ञान आणि बाजारपेठेची गरज यातील तफावत लक्षात घेऊन वेगळे अभ्यासक्रम सुरू करू शकतील.

एका तुकडीत ६० विद्यार्थ्यांना प्रवेश

महाविद्यालये स्वतंत्रपणे किंवा कौशल्य विकास अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्था, उद्योग यांच्याशी करार करून हे अभ्यासक्रम सुरू करू शकतील. महाविद्यालय स्वतच्या किंवा संस्थेच्या नावाने प्रमाणपत्र देऊ शकेल. तसेच अभ्यासक्रमाचा आराखडा, रचना तयार करण्याचे स्वातंत्र्यही महाविद्यालयांना मिळेल. अभ्यासक्रम सुरू करण्यासाठीची आर्थिक तरतूद मात्र महाविद्यालयांनी स्वतच्या वळाबर करायची आहे. या अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र विभा ग स्थापन करावा लागेत. एका तुकडीत ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. तसेच दर ३० विद्यार्थ्यांमागे एक प्रशिक्षक असावा अशी अट घालण्यात आली आहे.

करणारे अभ्यासक्रम हे प्रामुख्याने महाविद्यालयाची ओळख नसलेल्या खासगी संस्था चालवतात. त्यांना कौशल्य विकास विकास महामंडळाच्या अखत्यारित आणण्यात आले. आता त्याला समांतर यंत्रणा महाविद्यालये उभी करू शकणार आहेत. महाविद्यालयांना तीन ते सहा महिने कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची मुभा विद्यापीठ अनुदान आयोगाने दिली. आयोगाच्या झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. हे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचे श्रेयांकही मिळणार असून ते श्रेयांक पेढीत जमा होणार आहेत.

हॉटेलसह बारमध्ये मारहाण; गुन्हे दाखल

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल रेल्वे स्टेशन जवळील हॉटेल तसेच कळंबोली वसाहतीमधील बारमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या मारहाणीत काहीजण जखमी झाले आहेत. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे व कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

शहरातील सुंदर हेगडे यांच्या हॉटेलमध्ये आलेला ग्राहक अजय शिंदे याने रात्रीच्या वेळेस मोठमोठ्याने आरडाओरड केला. याबाबत हेगडे यांनी त्याला विचारणा केली असता अजय याने त्याला धक्काबुक्की करत खाली पाडले. यात ते जखमी झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत कळंबोली येथील तारा बारमध्ये रोहित लिहे हे त्याच्या मित्राबरोबर तेथे गेले होते. मद्यपान झाल्यानंतर वेटरने त्यांना बिल आणून दिले. बिलामध्ये डिस्काउंट द्या या क्षुल्लक कारणावरुन त्यांच्यामध्ये वादावादी झाली. तेथील वेटरने दोघांना मारहाण केल्याने याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

नोकरीच्या आमिषाने केली आठ लाखांची फसवणूक

। पनवेल । वार्ताहर ।

पार्ट टाइम जॉबच्या आमिषाने महिलेची तब्बल ८ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर सेक्टर ४ येथील सुलभा देवरुखकर यांना पार्टटाइम जॉबसाठी मेसेज आला. कृथिका या महिलेने टेलिग्राम खात्याची लिंक पाठवत पार्टटाइम जॉबचे आमिष दाखवले. देवरूखकर यांनी लिंक ओपन केल्यानंतर गुन्ह्याला प्रारंभ झाला. ग्राहकोपयोगी वस्तू विकणाऱ्या पवर ॲड टू कार्ट करून ठेवायचे व त्याचा स्क्रीनशॉट पाठवण्याबद्दल पैसे मिळणार असल्याचे आमिष देण्यात आले. टास्क पूर्ण केल्यानंतर बँक खात्याची माहिती देण्यात आली व खात्यावर ३०० रुपये पाठवण्यात आले. त्यानंतर एक हजार रुपये कृथिकाला पाठवले. दोन टास्क पूर्ण केल्यानंतर १ हजार ८०० रुपये व बक्षीस म्हणून २७७ रुपये पाठवण्यात आले. त्यानंतर देवरूखकर यांनी आणखी ६० हजार रुपये पाठवले व समोरून दोन टास्क पूर्ण करण्यास सांगितले. टास्क पूर्ण केल्यानंतरच पैसे परत मिळतील व त्या टास्क करता आणखी एक लाख भरावे लागतील, असे देवरूखकर यांना सांगण्यात आले. देवरूखकर टास्कच्या आमिषाला बळी पडल्या आणि त्यांनी आणखी ८ लाख ३० हजार रुपये भरले. मात्र, त्यानंतर देवरूखकर यांना टास्क देण्यात आला नाही. तसेच कृथिकाला सोबत त्यांचा संपर्कही झाला नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे कळताच त्यांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला.

लोकअदालतीत ३,६५१ प्रकरणे निकाली

। पनवेल । वार्ताहर ।

दखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने आयोजित केलेल्या पनवेल येथील न्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, वादपूर्व आणि दाखल अशी एकूण ३,६५१ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे, अशी माहिती अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल तथा जिल्हा न्यायाधीश जयराज वडणे यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात वाद पूर्ण प्रकरणे ठेवण्यात आली होती. पनवेल येथील न्यायालयात आयोजित केल्या गेलेल्या लोक अदालतीमध्ये वादपूर्व प्रकरणे व प्रलंबित अशी एकूण १२,२३३ प्रकरणे लोक अदालती मध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी वादपूर्व प्रकरणे ३,०१७ आणि प्रलंबित खटल्यांपैकी ६३४ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. त्याद्वारे पक्षकारांना एकूण ३ कोटी ६६ लाख ४७ हजार ५५.६६ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे. पनवेल येथील न्यायालयात ६ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलच्या माध्यमातूनदेखील प्रकरणे मिटवण्यात आली. या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, महानगरपालिका, बँक, पोलीस प्रशासन आणि सर्व पक्षकार यांनी भरघोस असा प्रतिसाद दिला. त्याबद्दल अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती पनवेल यांच्यावतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

पान १ वरून

सभागृहात मराठा आरक्षणावर चर्चा : सामंत

या चर्चेच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अनेक गोष्टी सांगतील. मात्र, मनोज जरांगे यांनी जी पहिली मागणी केली होती, ती आम्ही पूर्ण केली आहे. त्याच्यावर काम सुरू असून, निजामकालीन ज्या काही नोंदी सापडत आहे त्यानुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यात येत आहे. इम्पीरिकल डाटा गोळा करून आणि आयोगाला सांगून जमा झालेला इम्पीरिकल डाटा सुप्रीम कोर्टात मांडून मराठा समाज कसा मागासलेला आहे हे आम्ही सिद्ध करणार आहोत. त्यामुळे मराठा समाजाला टिकणारा आरक्षण आम्ही देणार असल्याचे उदय सामंत म्हणाले.

जातनिहाय जनगणना घोषित करा : यशोमती ठाकूर

कार्यालयात सर्वपक्षीय बैठक बोलवावी, आम्ही यायला तयार आहोत. मात्र, लोकांची फसवणूक सुरू आहे. जातनिहाय जनगणना करावी आणि मराठा समाजाला शाश्वत आरक्षण द्यावे. तसेच इतर घटकांना त्यांच्या संख्येप्रमाणे आरक्षण मिळाले पाहिजे. हीच भूमिका राज्य मागासवर्ग आयोगाची आहे. कोणत्याही समाजाला तात्पुरता दिलासा देऊन त्याची फसवणूक करू नका. असे यशोमती ठाकूर म्हणाल्या.

आंबा संरक्षणासाठी 'कृती दल'

स्वतंत्र बाजारपेठ शोधावी लागत नाही; परंतु गेल्या तीन-चार वर्षांपासून कोकणातील आंबा संकटात सापडला आहे.घाटमाथ्यानजीकच्या गावांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट, ढगाळ वातावरणाचे प्रमाण रायगड जिल्ह्यात अधिक आहे. या भागातील आंबा पिकाचे निसर्ग, तौक्ते वादळाने अतोनात नुकसान झाले. यात लाखो आम्रवृक्ष उन्मळून पडले. त्यानंतर गतवर्षी अवकाळी पाऊस झाला. डोंगराळ भागात आंब्याचा हंगाम पावसाळा सुरू होताना सुरू झाल्याने शेतकऱ्यांना फारसा फायदा घेता आला नाही. त्यानंतर या वर्षी उशिराने पडलेल्या थंडीमुळे दहा ते बारा दिवसांपूर्वी आंब्याला मोहोर फुटण्यास प्रारंभ झाला. याशिवाय काही प्रमाणात आंबा उत्पादन मिळण्याची शक्यता होती; परंतु सततच्या अवकाळीने उत्पादनाचा दर्जा खालावला. झाडांवर वरकरणी फळे दिसत असली तरी त्याचा काहीही उपयोग होणार नसल्याचे बागायतदार सांगतात. पूर्वपट्ट्याच्या तुलनेत पश्चिमपट्ट्यात अद्याप अवकाळीच प्रमाण कमीच होते. त्यामुळे जिल्ह्यातील महाड, पोलादपूर, सुधागड-पाली, कर्जत या पूर्वपट्ट्यातील तालुक्यात आंबा उत्पादन घ्यावे की घेऊ नये, असा प्रश्न बागायतदारांसमोर आहे. अशा येणाऱ्या संकटांमधून मार्गदर्शन करण्यासाठी कृती दलामधील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

फलोत्पादन योजनेंतर्गत आम्ही आंबा लागवड केली. काही वर्षे आंबा लागवडीतून उत्पादनही चांगले मिळाले; परंतु काही वर्षांपासून आंब्यावर लहरी वातावरणाचा मोठा परिणाम होत आहे. या वर्षीही अवकाळीचा फटका बसला आहे, यामुळे शेंडी पोखरणारी आळी, उंट आळी, फुले खाणारी आळीचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. जो मोहर आहे, त्यातील फळधारणा होईल, याबद्दल शेतकरी साशंक आहेत.

- जगन्नाथ पाटील, आंबा उत्पादक शेतकरी

'कृती दल' खासकरून आंबा पिकाच्या संरक्षणासाठी काम करणार आहे. त्यामुळे त्याचा कोकणातील शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होईल. वेगवेगळ्या रोगांना वेळेतच रोखण्यात यश आल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च कमी होऊन चांगल्या दर्जाचा पीक घेता येईल. यातून निर्यातक्षम आंबा पिकाचे उत्पादन येथील बागायतदारांना घेता येईल.

- प्रसाद गायकवाड , बागायतदार, अलिबाग

दत्त मंदिरातील चोरीचा तपास लागेना

देवाच्या चांदीच्या मूर्ती चोरीला गेल्याचे अनेक गुन्हे घडले आहेत. त्यातील काही चोऱ्यांचा तपास करण्यात पोलिसांना यश आले असले तरी तालुक्यातील प्रसिद्ध चौल-भोवाळे येथील दत्त मंदिरातील चोरीचा छडा अद्याप पोलिसांना लागलेला नाही. आरोपी सापडत नसल्याने पोलिसांनी तपास करण्याचे सोडून दिले की काय, अशी भावना दत्तभक्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे. चौल मंदिरातील ४० किलो चांदी चोरीला गेल्याची घटनेला आता वर्ष होईल, परंतु अद्याप तपास लागलेला नाही. यंदा चौल-भोवाळे येथील दत्तयात्रेला मंगळवार, दि. २६ डिसेंबरपासून प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर दत्त मंदिरातील चोरीच्या चर्चेला उधाण आले आहे.

वर्षभरानंतरही तपास नाही

चौल भोवाळे येथील प्रसिद्ध दत्त मंदिरात वर्षभरापूर्वी चोरी झाली होती. या मंदिरातील तब्बल चाळीस किलो चांदीची प्रभावळ चोरीला गेली होती. मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन चोरट्यांचे छायाचित्रण आढळून आले आहे. रेवदंडा पोलीस ठाण्यात वर्षभरात दोन अधिकारी बदलून आले. परंतु, एकाही अधिकाऱ्याला या चोरीचा तपास करता आला नाही.

प्रभावी यंत्रणा राबवा

यावर्षी मंगळवार, दि. २६ डिसेंबरपासून दत्तयात्रेला प्रारंभ होत आहे. दरवर्षी या ठिकाणी पाच दिवसांची यात्रा भरते. जिल्ह्यासह राज्य-परराज्यातील अनेक व्यावसायिक या यात्रेत व्यवसायासाठी येत असतात. त्यातून लाखो रुपयांची उलाढाल होत असते. बाहेरुन येणाऱ्या अनोळखी व्यावसायिकांबरोबर सर्वच व्यावसायिकांची नोंदणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी आतापासूनच प्रभावी यंत्रणा राबविण्यात यावी, अशी मागणी दत्तभक्तांकडून होत आहे.

चोरीचा तपास सुरू आहे. यंदा दत्त यात्रेच्या अगोदर विशेष सुरक्षेच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येतील, त्या करुन घेण्यावर भर देणार आहोत.

- राहुल अतिग्रे, पोलीस निरीक्षक, रेवदंडा पोलीस ठाणे

आतापर्यंत चोर सापडणे गरजेचे होते, अशी माझ्यासह सर्वच दत्तभक्तांची भावना आहे. पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. तेसुद्धा अधूनमधून याठिकाणी येत आहेत. परंतु, चोरीचा निकाल काहीतरी लागणे गरजेचे आहे. यामध्ये फक्त बाहेरचेच आहेत की आपल्याकडील कोण आहेत, हे कळायला तर हवेच. नुसता चोरीचा माल मिळणे महत्त्वाचे नाही, तर चोर पकडणे गरजेचे आहे.

- निकेश घरत, दत्तभक्त, चौल-सागमळा

आरोग्य शिबिराचा १७९ नागरिकांनी घेतला लाभ

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायत हद्दीतील नांदले येथे अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड माध्यम ातून मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

यावेळी आगरदांडा ग्रामपंचायत सरपंच आशिष हेदुलकर, उपसरपंच संतोष पाटील, शिक्षक वृंद फंदे, दिघी पोर्टचे चंदर देव संब्याल (संरक्षण विभाग), राजपुरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच इस्माईल सिद्दीकी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी मुंबई -विलेपार्ले येथील शल्यचिकित्सक डॉ. मयंक प्रधान, स्त्रीरोग तज्ञ डॉ. चेतना प्रहेली, त्वचारोग तज्ञ डॉ.मारुती मोहन जराग यांच्या टिमने आगरदांडा-नांदले पंचक्रोशीतील १७९ लोकांची मोफत आरोग्य तपासणी केली. यावेळी रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली.

स्थानिकांना गावातच आरोग्य सुविधा, मार्गदर्शन तसेच औषधोपचार मिळावेत. याउद्देशाने आयोजित शिबिरात डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आरोग्य तपासणीत त्वचेचे विकार तर युवकांना आणि ज्येष्ठ नागरिकांना गुडघे दुखी आणि सांधे दुखीचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. आहार आणि व्यायाम करण्याचे महत्व डॉक्टर्स माध्यमातून पटवून देण्यात आले. या शिबिरात येथील दिव्यांग, अबाल वृद्ध तसेच ९०,९५ वयोगट मधील वृद्धांनी देखील लाभ घेतला. दिघी पोर्टच्या माध्यमातून अदानी फाउंडेशनच्या उपस्थित वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनी अदानी फाउंडेशन म ाध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारचे आरोग्य संवर्धन उपक्रमाबाबत माहिती दिली.औषध वितरण व्यवस्था नितीन चांदोरकर माणगाव यांनी केली होती.अवधुत पाटील आणि ग्राम सखी प्राजक्ता अडुळकर, प्रज्ञा कासारे, यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

मुंबई-बडोदा महामार्गामुळे पनवेलचा भाव वधारणार

। पनवेल । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्ग, द्रुतगती मार्ग, जेएनपीए महामार्ग पनवेलमधून जात असल्याने जमिनींचे भाव गगनाला भिडले आहेत. आता त्यात मुंबई-बडोदा महामार्गाची भर पडली आहे. हा महामार्ग पनवेल तालुक्यातील मोर्बे गावात समाप्त होणार असून तेथून पुढे इतर मार्गांना जोडला जाणार आहे. सध्या मुंबई-बडोदा मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मोठमोठे प्रकल्पांमुळे पनवेलला विशेष महत्त्व असून भविष्यात या पट्ट्याचा भाव अधिक वधारणार आहे.

पनवेल हे मुंबई-पुणे या दोन महानगराचे मध्यवर्ती ठिकाण आहे. येथून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच पूर्ण होणार आहे. सिडकोबरोबरच अन्य मोठमोठे गृहप्रकल्प येऊ घातले आहे. आशिया खंडातील सर्वात मोठे रेल्वे स्थानक पनवेलचा कायापालट करण्यात येत आहे. यात मुंबई-बडोदा महामार्गाची भर पडली आहे. मुंबई-दिल्ली महामार्गातील दुसरा टप्पा मुंबई ते बडोदादरम्यानही एक्सप्रेस वे उभारला जात असून त्याचे काम वेगाने सुरू आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून मुंबई ते दिल्ली हा द्रुतगती मार्ग उभारला जात आहे. यातील पहिला टप्पा खुला करण्यात आला आहे. याच महामार्गाचा मुंबई ते बडोदा हा दुसरा टप्पा असून या टप्प्याचे काम महाराष्ट्रात सध्या वेगात सुरू आहे.

शिवभक्तांना रायगड प्रदक्षिणेचे वेध

। महाड । प्रतिनिधी ।

दरी-खोऱ्यातील खडतर वाटा, दमछाक करणारी चढण, अंगातून वाहणाऱ्या घामाच्या धारा आणि सोबतीला रायगडच्या जैवविविधतेचा आस्वाद घेत रायगड किल्ल्याला प्रदक्षिणा घालण्याची मजा काही औरच. स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाला प्रदक्षिणा घालण्याची इच्छा अनेकांच्या मनात असते. अशा साहस वीरांसाठी आणि रायगड प्रेमींसाठी रायगड जिल्हा परिषद आणि महाड युथ क्लबच्या सहकार्याने २४ डिसेंबरला राज्यस्तरीय रायगड प्रदक्षिणा करण्याची संधी चालून आली आहे. दरवर्षी किल्ले दर्शनासाठी लाखो पर्यटक येतात. परंतु रायगडाचा खरा इतिहास आणि परिसर समजून घ्यायचा असेल तर रायगड प्रदक्षिणा प्रत्येकाने एकदा तरी अनुभवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जवळपास ३२ वर्षांपासून रायगड युथ क्लब हा उपक्रम राबवत आहे. दरवर्षी सुमारे हजार प्रदक्षिणार्थी यात सहभागी होतात. किल्ल्याच्या १६ किलोमीटरचा परिसर डोंगरवाटेने जात व चार तासांच्या खडतर प्रवासानंतर ही प्रदक्षिणा पूर्ण होते. साहसवीरांना आव्हान देणारी आणि आपल्या शारीरिक शक्तीचे मूल्यांकन करणारी ही प्रदक्षिणा असली तरी ती पूर्ण झाल्यानंतर एक आत्मिक समाधान मिळते. या प्रदक्षिणेमध्ये कधी पक्ष्यांची किलबिलाट कानी पडतो तर कधी सरपटणाऱ्या प्राण्यांचा फुत्कार, जाळीदार वृक्षांची थंडगार सावली तर कधी अंगातून निघणाऱ्या घामाच्या धारा, उंच अरुंद चढण तर कधी खाली कोसळू असे तीव्र उतार असे एकापेक्षा एक सरस विविध पडाव प्रदक्षिणेत पार करण्याचा एक वेगळा अनुभव मिळतो. लहानांपासून वृद्धांपर्यंत अनेक जण या प्रदक्षिणेत सहभागी होत असल्याने अनुभवाची मोठी शिदोरी प्रदक्षिणार्थींकडे जमा होते.

अशी असते प्रदक्षिणा

रायगड प्रदक्षिणेला २४ डिसेंबरला सकाळी ६ वाजता पायथ्यापासून सुरुवात होणार आहे. प्रदक्षिणेत १० वर्षांवरील कोणतीही सुदृढ व्यक्ती सहभागी होऊ शकते. ५० वर्षांवरील व्यक्तीला फिटनेस सर्टिफिकेट आवश्यक आहे. १६ किलोमीटरची ही प्रदक्षिणा पूर्ण करायला प्रत्येकाच्या क्षमतेप्रमाणे किमान ४ तासाचा अवधी लागतो. प्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्यांना युथ क्लबतर्फे प्रशस्तीपत्रक दिले जाणार आहे. सहभागी होणाऱ्यांना मुक्कामाची सोय विनामूल्य केली जाते. तसेच प्रदक्षिणेच्या दिवशी चहा नाश्ता, पॅक फूड व जेवण आयोजकांमार्फत दिले जाते.

सहभागी होणाऱ्यांसाठी हे आवश्यक

प्रदक्षिणेत सहभागी होणाऱ्यांनी आपल्या सोबत पाण्याची बाटली, लंच बॉक्स, टोपी, सुती कपडे, अंथरूण व पांघरूण, लागणारी औषधे सोबत आणावीत. रायगडला जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील महाड येथून २५ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. मुंबई-पुणे येथून थेट बससेवा आहेत. तसेच कोकण रेल्वेमार्गावर वीर किंवा माणगाव स्थानकावर उतरून रायगडला जाता येते.

रायगडात पाच लाख लिटर दुधाचा तुटवडा

पर राज्य आणि जिल्ह्यातून दूध आयात

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात कृषी क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे, त्याचा फटका या क्षेत्रावर अवलंबून असलेल्या कृषीपूरक जोड धंद्याला बसतो आहे. जिल्ह्याला दररोज आठ लाख ३० हजार लिटर दुधाची गरज आहे. मात्र केवळ तीन लाख ३८ हजार लिटर दूध उत्पादित होत असल्याने सुमारे ५ लाख लिटर दूध पुणे, कोल्हापूर, नगर, गुजरात येथून रायगडमध्ये येते.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे कृषी क्षेत्रावर आधारित विविध उद्योगांची घसरण होऊ लागली आहे. कृषी क्षेत्रच कमी झाल्याने गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तर पर्यटन व्यवसायात संधी निर्माण झाल्याने तरुणवर्ग पर्यटन व्यवसायाकडे वळला आहे. याचा मोठा फटका येथील दुग्ध व्यवसायाला बसला असून मागणीच्या तुलनेत उत्पादन कमी होत आहे.

रायगड जिल्ह्याची एकेकाळी भाताचे कोठार अशी ओळख होती. शेतीला जोड म्हणून दूधदुभती जनावरे पाळली जायची. गेल्या काही वर्षात जिल्ह्यात औद्योगिकरण वाढले आहे. मोठमोठ्या औद्योगिक वसाहती जिल्ह्यात निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शेती क्षेत्र कमी झाले आहे. शेती कमी झाल्याने हिरवा चारा उपलब्धता कमी झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायही घटले आहे. मुंबई, पुण्यासारखी मोठी शहरे रायगड जिल्ह्यालगत असल्याने तरुण वर्ग नोकरीसाठी शहरात स्थलांतरित होत आहे. त्यामुळे कृषी व्यवसायाशी निगडित जोडव्यवसायही कमी झाले आहेत. परिणामी जिल्ह्यात दिवसेंदिवस दुधाची टंचाई जाणवत आहे.

दूध उत्पादन देणारे पशुधन

देशी गायी–	१,७०,३८८ (दुभत्या ५१,११६), दूध उत्पादन– २,०४,४६४
संकरित गायी –	६,५१८ (दुभत्या १९५५), दूध उत्पादन– २१,५०५
म्हैस वर्ग –	६२,२२५ (दुभत्या १८,६६८), दूध उत्पादन – १,१२,००८
एकूण–	२,३९,१३१ (दुभती– ७१,७३९), दूध उत्पादन – ३३७९७७

लोकसंख्येच्या तुलनेत पशुधन कमी

जिल्ह्यामध्ये देशी गायी, संकरित गायी आणि म्हैसवर्गीय जनावरांची एकूण संख्या २ लाख ३९ हजार १३१ आहे. यातील ३० टक्के जनावरे दूध देणार आहेत. या जनावरांद्वारे दररोज एकूण ३ लाख ३७ हजार ९७७ लिटर दूध उपलब्ध होते. जिल्ह्याला दररोज ८ लाख २९ हजार ७७३ लिटर दुधाची गरज आहे. रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणेप्रमाणे २६ लाख ३४ हजार आहे. दहा–बारा वर्षात जिल्ह्याची लोकसंख्या वाढली आहे. तसेच दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा वापर वाढला आहे. त्यामुळे जिल्ह्यात दुधाची मागणी प्रचंड वाढली आहे.

१८ दूध उत्पादक सहकारी संस्था

दूध उत्पादन वाढीसाठी सहकारी संस्था चांगले काम करतात. यासाठी राज्य सरकारकडून काही सवलतीही संस्थांना दिल्या जातात. प्रत्येक जिल्ह्यात या साठी वेगळ्या कार्यालयाची निर्मिती केली आहे. परंतु रायगड जिल्ह्यात या कार्यालयाचे काम बसण्यात जमा आहे. जिल्ह्यात दुग्ध संकलन करणाऱ्या नोंदणीकृत १३५ सहकारी संस्था आहेत. त्यातील १८ कार्यरत असून त्यांच्याकडून १५७३ प्रतिदिन दूध संकलन होते. यात अवसायानात निघालेल्या ११७ संस्था आहेत.

बेपत्ता मुलांच्या शोधासाठी पथके

हरवलेल्यांमध्ये मुलींची संख्या अधिक

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबईतून एकाच दिवशी आठ मुले-मुली बेपत्ता झाल्याच्या चार दिवसांपूर्वीच्या घटनेमुळे खळबळ उडाली होती. पोलीसही चक्रावून गेले होते. मात्र यापैकी पाच मुले त्याच दिवशी घरी परतली. तर अन्य दोघांना पोलिसांनी ठाणे, पालघर जिल्ह्यांतून शोधून काढले. तर घर सोडून गेलेला एक मुलगा शुक्रवारी सापडला आहे. त्यामुळे पालकांनी न घाबरण्याचे आवाहन नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केले आहे. दरम्यान, गेल्या अकरा महिन्यांत बेपत्ता झालेल्या अनेक मुला-मुलींपैकी बऱ्याच जणांचा शोध लागला आहे. असे असले तरी अद्याप ४५ जणांचा शोध घेतला जात असून त्यासाठी स्वतंत्र पथके नेमण्यात आली आहेत.

नवी मुंबईतून मागील अकरा महिन्यांत ३७१ बालके घर सोडून गेली. याबाबत नवी मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांत अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले. यापैकी ३२६ मुलांचा शोध नवी मुंबई पोलिसांच्या पथकाने लावला. अद्याप न सापडलेल्या मुलामुलींची संख्या ४५ असून त्यात ३७ मुली तर ८ मुले आहेत. या मुला-मुलींच्या शोध मोहिमेसाठी नवी मुंबई पोलिसांची दोन स्वतंत्र पथके काम करीत आहेत.

सावत्र आईमुळे घर सोडले

काही दिवसांपूर्वी हरविलेल्या एका बालकाचा शोध याच पोलीस पथकाने लावण्यासाठी अकोला गाठले. तेथे पथकाला मुलगा सापडला. मुलाला पोलिसांनी समुपदेशन केल्यानंतर त्या बालकाने दिलेल्या जबाबाप्रमाणे सावत्र आईमुळे त्याने घर सोडल्याचे सांगितले. त्या मुलाची स्वगृही परतण्याची इच्छा नव्हती. मात्र पोलिसांनी त्याचे योग्य समुपदेशन केल्याचे साहाय्यक पोलीस आयुक्त राठोड यांनी बोलताना सांगितले.

३७१ बालकांमध्ये मुलींची संख्या २७२ तर मुलांची संख्या ९९ एवढी आहे. पोलिसांना सापडलेल्या बालकांमध्ये २३५ मुली सापडल्या, तर मुले ९१ मुले सापडली. मागील ११ महिन्यांत विविध कारणांमुळे या बालकांनी घरे सोडली. बालक पळवून नेण्याचे प्रमाण कमी असले तरी १६ वयोगटावरील मुलींची पळून जाण्याचे आणि त्यानंतर घरी येण्याचे प्रमाण अधिक असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

३७१- अकरा महिन्यांत हरवलेली मुले-मुली

३२६- सापडलेली मुले-मुली

४५- अद्याप न सापडलेली मुले-मुली

जानेवारी ते नोव्हेंबर महिनाअखेरपर्यंत नवी मुंबई पोलीस दलाच्या मानवी तस्करी विरोधी कक्षाने अपहरणाच्या गुन्ह्यांमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक प्रकरणात यशस्वी शोध मोहीम केली. मात्र अजूनही ४५ मुलामुलींचा शोध लागलेला नाही. नवी मुंबई पोलीस दलाचे साहाय्यक पोलीस आयुक्त गजानन राठोड यांनी दिलेल्या माहितीवरून मागील काही दिवसांत मुलांचा शोध लावूनही समाजमाध्यमांवर गैरसमज पसरविणाऱ्या लघुसंदेशामुळे अहोरात्र तपास करणाऱ्या पोलिसांच्या पथकाचे मनोबल खच्चीकरण होण्याची शक्यता आहे. मानवी तस्करी विरोधी कक्षाची दोन पथके आणि संबंधित पोलीस ठाण्याचे स्वतंत्र एक पथक मुलामुलींच्या शोध मोहिमेत गुंतली आहेत. १६ वर्षे वयाच्या मुलींचे घर सोडून जाण्याचे प्रमाण अधिक आहे.

माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या हत्येप्रकरणी

तिघांना जन्मठेप

- आठ वर्षांपूर्वी मुंब्रा येथे केला होता खून
- बेकायदेशीर बांधकामाच्या तक्रारीचा वाद

। ठाणे । वृत्तसंस्था ।

मुंब्रा येथील एका गृहसंकुलाच्या आवारात बेकायदा उभारलेल्या प्रवेशद्वारासंदर्भात ठाणे महापालिकेकडे तक्रार केल्याच्या कारणावरून एका माहिती अधिकार कार्यकर्त्याची आठ वर्षांपूर्वी तीन जणांनी हत्या केली होती. ठाणे न्यायालयाने याप्रकरणी पिता-पुत्रासह तिघांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

अब्दुल मजीद रशीद काझी (४२), मोहम्मद उस्मान बशीर अहमद शेख (४५) आणि सिद्धीक काझी (२१) अशी शिक्षा झालेल्या तिघांची नावे आहेत. मुंब्रा येथे २०१६ मध्ये एका गृहसंकुलाच्या आवारात बेकायदेशीरपणे प्रवेशद्वार उभारण्यात आला होता. या प्रवेशद्वाराविषयी माहिती अधिकार कार्यकर्ते साजिद अन्सारी यांनी ठाणे महापालिकेकडे तक्रार दाखल केली होती.

त्यामुळे अब्दुल काझी, त्याचा मुलगा सिद्धीक आणि मोहम्मद उस्मान बशीर अहमद शेख यांनी साजिद यांना चाकू, लाकडाच्या सहाय्याने बेदम मारहाण केली होती. यात साजिद यांचा मृत्यू झाला होता.

तर याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शुक्रवारी याप्रकरणाची सुनावणी ठाणे न्यायालयात झाली. न्यायाधीश वसुधा भोसले यांनी तिघांना मरेपर्यंत जन्मठेप आणि प्रत्येकी १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

फिर्यादी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील ॲड. विनीत कुलकर्णी यांनी बाजू मांडली. तर, तपासी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक एम. डी. जाधव यांनी काम पाहिले.

दुचाकी चोरणारा अटकेत

। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।

दुचाकी चोरी करण्यासाठी मित्रांचाच वापर अत्यंत कल्पकतेने करणाऱ्या आरोपीला नेरुळ पोलिसांनी अटक केली आहे. चौकशीत त्याने केलेल्या अन्य चार गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे. आरोपी स्वतः डिलेव्हरी बॉयचे काम करीत असून त्यासाठी वापरात असलेली दुचाकीही चोरीची असल्याचे तपासात समोर आले आहे.

कुणाल सोनवणे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. १६ सप्टेंबरला नेरुळ पोलीस ठाणे हद्दीतून एक दुचाकी चोरी झाली होती. या दुचाकी चोरीचा तपास करत असताना तांत्रिक तपास आणि परंपरा खबरी कडून मिळालेली माहिती तसेच काही ठिकाणच्या सीसीटीव्हींची पाहणी केली असता सोनवणे त्यात आढळून आला. मात्र त्यावेळी आरोपीचे नाव व अन्य कुठलीच माहिती समोर आली नव्हती.

सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेवाळे व अन्य गस्त पथकाला सोनवणे नेरुळ स्टेशन परिसरात आढळून आला.

त्याच्या संशयास्पद हालचाली आणि दुचाकी चोरी प्रकरणी सीसीटीव्हीतील व्यक्ती एकच असल्याची शंका आल्याने त्यांनी सोनावणे याला ताब्यात घेत पोलीस ठाण्यात आणले. तेथे चौकशी केली असता त्याने गुन्हा कबुल केलाच शिवाय अन्य तीन दुचाकी अशा एकूण चार दुचाकी चोरी आणि एक बॅटरी चोरीच्या गुन्ह्याचीही कबुली दिली. त्याच्या कडील दुचाकी तो डिलेव्हरी कामासाठी वापरत होता. सदर दुचाकी जप्त करण्यात आली आहे. अशी माहिती नेरुळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांनी दिली.

गुन्हा करण्याची पद्धत

आरोपी हा जी गाडी चोरी करायची आहे ती गाडी अगोदर हेरून ठेवत असे. दुचाकीचा मालक गाडी पार्क करून गेल्यावर येण्यास उशीर होणार असल्याची खात्री करून घेत असे. यासाठी तो रेकी करत होता. अशी दुचाकी हेरली कि आपल्याच एखाद्या मित्राला सदर गाडी कुठे पार्क केली, क्रमांक काय, रंग कोणता, हि माहिती देत होता. मी बाहेर गावी आहे, किल्ली हरवली आहे, कृपया किल्ली बनवणाऱ्याला घेऊन जावे आणि किल्ली बनवून गाडी घरी आणावी, अशी आर्जवी विनंती करीत होता. अशाच प्रकारे तीन दुचाकी चोरी त्याने केल्याची कबुली दिली.

तलाठी परीक्षेत गुणांची लॉटरी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

प्रश्नपत्रिकेत चुकीचे प्रश्न आल्यास त्याचे सरसकट गुण देण्याची बाब तलाठी परीक्षेतील उमेदवारांच्या चांगलीच पथ्यावर पडली आहे. या परीक्षेतील प्रश्नसुचीवर आक्षेप मागविण्यात आले होते. त्यात ११४ प्रश्न चुकीचे असल्याचे निष्पन्न झाले. या चुकीच्या प्रश्नांसाठी पूर्ण गुण देण्यात येणार असल्याचे तलाठी परीक्षा राज्य समन्वयकाकडून जाहीर करण्यात आले आहे.

चुकलेल्या प्रश्नांचे मिळणार ११४ गुण

राज्यात ४ हजार ४४६ तलाठी पदासाठी परीक्षा घेण्यात आली होती. त्यासाठी राज्यातून १० लाख ४१ हजार ७१३ अर्ज आले होते. प्रत्यक्षात ८ लाख ६४ हजार ९६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. अधिक संख्या असल्याने भूमी अभिलेख विभागाने तीन टप्प्यांत परीक्षा घेतली. परीक्षेची एकूण ५७ सत्रे पार पडली. २८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर दरम्यान आक्षेप मागविण्यात आले. १६ हजार २०५ पैकी ९ हजार ७२ आक्षेप मान्य झाले. त्यातील ३२ प्रश्नांचे पर्याय बदलण्यात आले. तर ११४ प्रश्न किंवा उत्तरे चुकीचे असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना याचे पूर्ण गुण देण्याचा निर्णय झाला आहे. भूमी अभिलेख विभागाने गुणसुची तयार केली आहे. अंतिम निर्देश आल्यानंतर ती जाहीर होणार. त्यानंतर निवडसुची जाहीर केली जाईल, असे सूचित झाले.

वाढदिवसानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

। अलिबाग । वार्ताहर ।

अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बळवंत वालेकर यांच्या ८० व्या वाढदिवाचे औचित्य साधून मंगळवार, दि. १२ डिसेंबर रोजी अ.ता.शि.प्र.मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना त्याच दिवशी दुपारी एक वाजता शिशुविहार प्राथमिक शाळा, अलिबाग येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव द.ल. माळवी यांनी दिली.

अल्पवयीन मित्रावर पेट्रोल टाकून पेटवले

। अंबरनाथ । वृत्तसंस्था ।

घराबाहेर खेळताना अल्पवयीन मित्राने अल्पवयीन मित्राला पेट्रोल टाकून जाळल्याची घटना अंबरनाथला घडली आहे. या दुर्घटनेत भाजलेल्या मुलाला याला येथील डॉ. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून तो २० टक्के भाजला असल्याचे त्याच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले. शहराच्या पश्चिम भागातील सिद्धार्थनगर येथे राहणारा अकरा वर्षीय मुलगा आपल्या घराबाहेर मित्रांसोबत खेळत होता. दरम्यान, अचानक त्याच्या अल्पवयीन मित्राने बाटलीमधून पेट्रोल आणून त्याच्या अंगावर टाकले. त्यानंतर त्याला पेटवून दिले. त्यामुळे तो धावत घरात आला. त्याच्या आईने आग विझवली व त्याला डॉ. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

तलवारीने वार करून तरुणाची हत्या

। ठाणे । वृत्तसंस्था ।

तलवारीने वार करून एक जणाची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. सतीश पाटील असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या हत्येचे कारण स्पष्ट झाले नाही. गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. सतीश पाटील हे वर्तकनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहण्यास असून त्यांचा इस्टेट ब्रोकरचा व्यवसाय होता. कासारवडवली आनंदनगर परिसरात पाटील गेले असता त्यांच्यावर हल्ला झाला. त्यांच्या चारचाकीला दोन तरुणांनी दुचाकी आडवी घालून थांबवले. गाडीचा दरवाजा उघडून त्यांनी पाटील यांच्यावर तलवारीने वार केले. यात सतीश पाटील हे गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावले. त्यानंतर हल्लेखोरांनी तिथून पळ काढला.

चवदार टपोऱ्या दाण्याच्या गावठी शेंगांच्या पोपटीलाच अधिक पसंती

लज्जतदार पोपटी पार्ट्यांच्या आयोजनाचे बेत

रायगड । प्रतिनिधी ।

हिवाळी हंगामात अनेकांना लज्जतदार पोपटी पार्ट्यांचे, सहलींचे वेध लागले आहेत. वालाच्या शेंगा भामरुडाच्या (भांबुर्डी) पाल्यात मडक्यात टाकून कांदा, बटाटा, रताळी तसेच अंडी, चिकन घालून त्यांची लज्जत वाढविली जाते. अवकाळी पावसामुळे स्थानिक गावठी वालाच्या शेंगा तयार होण्यास उशीर होणार असल्याने खवय्यांना पुण्यावरून आलेल्या वालाच्या शेंगांवरच बेत करावे लागत आहे.जिल्ह्यात पिकवलेल्या, चवदार टपोऱ्या दाण्याच्या गावठी शेंगांच्या पोपटीलाच अधिक पसंती आहे. मात्र पावसामुळे नुकसान झाल्याने स्थानिक गावठी शेंगा अजून तयार झालेल्या नाहीत. उरणमध्ये काही ठिकाणी गावठी वाल मिळू लागले आहेत.

रायगड जिल्ह्यात गावठी वालाच्या शेंगांची पोपटी प्रसिद्ध आहे. ठिकठिकाणी शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत पोपटी पार्ट्यांची धम्माल पाहायला मिळते. काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाण होते. अनेक जणांना यातून चांगले उत्पन्नही मिळते.

निडीच्या चवदार गावठी शेंगा

पोपटीसाठी अस्सल गावठी शेंगांनाच पसंती असते. गावठी शेंगांमुळेच खरी लज्जत व चव टिकून राहते. मुंबई-गोवा महामार्गावर नागोठण्याजवळील निडी गावातील शेंगा रुचकर व टपोरे दाण्यांसाठी प्रसिद्ध आहे. निडी गावालगतच्या जमिनीचा पोत कसदार असून परंपरागत पद्धतीने जपणूक करून ठेवलेले बियाण्याचाच वापर केला जातो. हे बियाणे दुसरे कुठे नेऊन पिकविल्यास अशी दर्जेदार शेंग होत नाही. या वालाला विशिष्ट चव, असून दाण्याचा आकारही मोठा असतो. सुरुवातीला बांधावर आलेल्या शेंगाची चव तर अधिकच रुचकर असते. अवकाळी पाऊसामुळे शेंगा तयार होण्यास उशीर झाल्याचे स्थानिकांनी सांगितले.

पत्र्याच्या डब्यातही पोपटी

पोपटीसाठी मडक्यांना खूप मागणी असते. मडके उपलब्ध नसल्यास त्याऐवजी तेलाच्या पत्र्याच्या डब्यामध्येही पोपटी केली जाते. यासाठी पत्र्याच्या डब्याचे तोंड तीन बाजूने कापले असते. अगदी मडक्यात लावतात, त्याप्रमाणे कृती करून पत्र्याचे झाकण घट्ट लावावे व आगीवर उपडे ठेवावे. काही वेळेला मडके फुटते किंवा त्याला तडा जातो आणि आतील साहित्य करपते किंवा अर्धवट शिजते. मात्र पत्र्याच्या डब्यामध्ये ही भीती नसते.

भांबुर्डीच्या पाल्याचे गुणधर्म

पोपटीत भांबुर्डीच्या पाल्याचा उपयोग केला जातो. याला गोरखमुंडी, वसई-विरारमध्ये बोडथोला, काही ठिकाणी कोंबडा तर रायगडमध्ये भांबुर्डी किंवा भामरूड असे म्हणतात. पावसाळ्यानंतर हा पाला रस्त्याच्या कडेला माळरानात उगवतो. पाल्यात औषधी गुणधर्म असतात. जखम झाल्यास पालाच्याच रस जखमेवर चोळतात. पोपटीमध्ये हा पाला टाकल्याने वाफेवर शेंगा चांगल्या शिजतात. तसेच वालच्या शेंगा पोटाला बाधत नाहीत आणि लज्जतदार चव येते.

जिल्ह्यात रब्बी हंगामात साधारण साडे पंधरा हजार हेक्टरवर कडधान्याचे पीक घेतले जाते. त्यामध्ये सर्वात जास्त जवळपास चार हजार ३८१ हेक्टरवर वालाची लागवड केली जाते. गावठी वालाच्या शेंगांना सुरुवातीला चांगला दर मिळतो. किलोला १०० ते १५० रुपये, नंतर शेंगा सर्वत्र येवू लागल्यावर दर ४० ते ५० रुपये किलोपर्यंत जातो.

उरात रुतलेला काटा

नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांचा भाजप हा एक दीर्घद्वेषी पक्ष आहे. आपल्याला त्रास देणाऱ्या शत्रुला नष्ट करण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. महुआ मोईत्रा यांची लोकसभेतील खासदारकी रद्द करणे हा त्याचाच आविष्कार आहे. मोईत्रा यांनी पूर्वी भाजपचे निशिकांत दुबे यांची एमबीएची पदवी बनावट असल्याचा आरोप केला होता. त्यांनाच मोईत्रा यांच्याविरोधात आरोप करण्यासाठी भाजपने पुढे केले. विरोधकांबाबत अत्यंत आक्षेपार्ह शेरेबाजी करण्याबाबत दुबे प्रसिद्ध आहेत. महुआ यांनी मोदींच्या राजवटीवर आपल्या फर्ड्या इंग्रजीत वेळोवेळी टीका केली. त्यांचे बोलणे-वागणे एखाद्या चित्रपट तारकेप्रमाणे स्टाईलिश आहे. त्यामुळे तरुण वर्गात त्यांच्या भाषणांच्या क्लिप्स विशेष लोकप्रिय आहेत. उदाहरणार्थ, फॅसिझमबाबत त्यांनी केलेले भाषण. मोईत्रा यांनी लोकसभेत अदानी आणि मोदी यांच्या संबंधांविषयी सातत्याने सवाल उपस्थित केले. महुआंनी पूर्वी अमेरिकेत अर्थ क्षेत्रातील कंपन्यांमध्ये काम केलेले आहे. त्यामुळे उच्चशिक्षित तरुणांना त्यांची भाषा समजते व पटते. हेच मोदी सरकारला अनेक दिवसांपासून सलत होते. त्याचमुळे महुआ यांचा काटा काढण्यात आला आहे. त्यासाठी अतिशय पद्धतशीर योजना आखून त्या विविध प्रकारे बदनाम होतील हे पाहिले गेले. यापूर्वी अगदी इंदिरा गांधींच्या काळातही इतका दीर्घ पल्ल्याचा द्वेष आपल्या विरोधकांबाबत दाखवला गेलेला नाही. आपण एका भयंकर खुनशी राजवटीत राहत आहोत याची जणू जाणीवच महुआ प्रकरणाच्या निमित्ताने सर्व विरोधकांना करून दिली गेली आहे. मोईत्रा या तृणमूल काँग्रेसच्या खासदार असून ममता बॅनर्जींचा करिश्म्यामुळेच त्या विजयी झाल्या असणार यात शंका नाही. मात्र त्यांची संसदेतील कामगिरी ही त्यांच्या स्वयंप्रज्ञ राजकारणाची चुणूक दाखवणारी होती. संसदेतील त्यांची उपस्थिती सुमारे ८५ टक्के म्हणजे इतर खासदारांहून अधिक आहे. शिवाय त्यांची बहुतेक भाषणे ही मोदींवरच्या टीकेमुळे चांगलीच लक्षवेधी ठरली. म्हणजे त्या अत्यंत प्रभावीपणे आपले काम करीत होत्या.

प्रश्नाचे हत्यार

मोईत्रांनी खासदार म्हणून प्रश्न विचारण्याच्या बदल्यात पैसे घेतले असा त्यांच्यावरचा मुख्य आरोप आहे. संसद वा विधिमंडळांमध्ये प्रश्नोत्तराचा तास असतो. यात खासदार वा आमदार लेखी प्रश्न विचारतात. त्यांना ते काही दिवस आधी सादर करावे लागतात. मग सरकारी यंत्रणा या प्रश्नांची उत्तरे तयार करते व मंत्री ती सभागृहात देतात. यातील काही प्रश्नांची लेखी उत्तरांच्या पलिकडे चर्चा होते. खासदार त्याबाबत उपप्रश्न विचारून सरकारला भंडावून सोडू शकतात. यातील उत्तरे ही सरकारची अधिकृत व कायदेशीर भूमिका असते. त्यामुळे मंत्र्यांना फार काळजीपूर्वक विधाने करावी लागतात. म्हणूनच, कोणतेही सरकार अजूनही या प्रश्नोत्तरांना घाबरते. भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी, एखाद्या अधिकाऱ्याची बदली वा निलंबन, एखाद्या योजनेसाठी अधिक रकमेची तरतूद अशा गोष्टी या प्रश्नोत्तरातून साध्य करता येतात. त्यामुळे हे प्रश्न हे विरोधकांचे हत्यार असते. महुआ यांनी अदानीच्या विरोधात सातत्याने भूमिका घेतली होती. त्यामुळे त्याबाबत त्या काही प्रश्न विचारणार हे उघड होते. मात्र इथे हेच हत्यार त्यांच्यावर उलटवण्याचा प्रयत्न झाला आहे. उद्योगांमधील अदानीच्या प्रतिस्पर्धी कंपन्यांना फायदा व्हावा या हेतूने महुआ यांनी प्रश्न विचारले असा बनाव तयार करण्यात आला. त्यासाठी त्यांच्याच जुन्या मित्रांना माफीचे साक्षीदार करण्यात आले. खासदार वा आमदारांना आपले प्रश्न मेल करण्यासाठी विशिष्ट लॉगइन व पासवर्ड दिलेला असतो. महुआ यांनी हा पासवर्ड दर्शन हिरानंदानी या बिल्डर कुटुंबातील व्यावसायिकाला दिला व त्याने महुआंच्या खात्यावरून अदानीच्या विरोधातील काही प्रश्न विचारले असा त्यांच्यावरचा आरोप आहे. महुआ यांनी हा पासवर्ड आपण दिला होता हे मान्य केले. मात्र त्या बदल्यात आपल्याला काही पैसे मिळालेले नाहीत हे ठासून सांगितले. दुर्दैवाने यातील काही गोष्टी त्यांच्या विरोधात जाणाऱ्या ठरल्या.

अदानीच्या बचावासाठी

हिरानंदानी हा काही कंत्राटांमध्ये अदानीचा प्रतिस्पर्धी होता हे उघड होते. शिवाय, महुआ यांना या हिरानंदानीने काही महागड्या भेटी दिल्याचे व त्याची गाडी काही वेळा महुआंनी वापरल्याचे दिसून आले. महुआ यांनी यातील एकही गोष्ट अमान्य केली नाही. मात्र मित्र म्हणून हिरानंदानी याने केलेल्या गोष्टी आणि विचारलेले प्रश्न यांचा काहीही संबंध नाही असे त्यांचे म्हणणे आहे. एकूण हे सर्व प्रकरण पाहता भाजपने हिरानंदानी याचा अत्यंत धूर्तपणे वापर करून घेतला हे स्पष्ट दिसते. त्यामुळेच हा एकेकाळचा मित्र आता त्यांच्या विरोधात साक्ष देतो आहे. यात गंमत अशी आहे की, महुआने विचारलेले अदानीबाबतचे प्रश्न प्रत्यक्षात पटलावर आले का, त्यामुळे सरकारची काय पंचाईत झाली किंवा अदानीचे काय नुकसान झाले हे सगळेच गुलदस्त्यात आहे. महुआने प्रश्न विचारले म्हणून अदानीचे एखादे कंत्राट रद्द झाले किंवा सरकारवर दबाव आला असे कोठेही घडलेले नाही. तरीही वर म्हटल्याप्रमाणे निव्वळ खुनशीपणे घेरण्यात आले आहे. वास्तविक सर्वच खासदार आपला पासवर्ड आपले कर्मचाऱ्यांना देतात व तेच खासदारांच्या वतीने प्रश्न फाईल करीत असतात. मात्र महुआंना यात बळीचा बकरा बनवण्यात आले. त्यासाठी अनेक पातळ्यांवर महुआंचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न झाला. महुआ या आपल्या जोडीदारापासून विभक्त झालेल्या आहेत. अशा स्थितीत दर्शनसारख्या मित्रांबरोबर त्यांची कशी जवळीक आहे तसेच त्या आपले खासदार म्हणून कर्तव्य पार पाडताना कशा नीतीमान नाहीत हे दर्शवण्याची ही धडपड होती. यासाठी नेमलेल्या संसदेच्या एथिक्स कमिटीमध्ये त्यांची वाईट रीतीने उलटतपासणी घेण्यात आली. अखेर या समितीचा ४९५ पानांचा अहवाल संसदेपुढे मांडून चर्चेची संधी न देताच एका तासात महुआंची खासदारकी रद्द करण्यात आली. महुआंना बदनाम करून दूर करण्याचे कारस्थान यशस्वी झाले आहे. मात्र अदानी हा सरकारच्या उरात रुतलेला काटा असून त्याच्या बचावासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकते हे या निमित्ताने पुन्हा एकवार स्पष्ट झाले.

विचार

निवडणूक निकालांचा महाराष्ट्रावर परिणाम

राही भिडे

भाजपला तीन राज्यांमध्ये मिळालेल्या यशाचा परिणाम देशाबरोबरच महाराष्ट्राच्या राजकारणावरही होणार आहे. भाजपला मिळालेल्या यशामुळे पक्ष कार्यकर्त्यांचे आणि नेत्यांचे मनोधैर्य उंचावले आहे. महाराष्ट्रात महायुतीतील पक्षांना भाजपची जेवढी गरज आहे, तेवढी भाजपला उलट बाजुने राहिलेली नाही. महाविकास आघाडीतही काँग्रेसला नमते घ्यावे लागेल. शिवाय इतर पक्षांमधून भाजपमध्ये पुन्हा 'इनकमिंग' वाढण्याचा धोका आहेच.

भाजपने चारपैकी तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्यामुळे अपेक्षेप्रमाणे लोकसभेच्या निवडणुकीसंदर्भातील चर्चांना सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील गेल्या काही वर्षांमधील राजकीय स्थिती पाहता देशातील चार महत्त्वाच्या राज्यांमधील निकालांचा या राज्याच्या राजकारणावर काय परिणाम होणार याचीही उत्सुकता आहे. गेल्या काही निवडणुकांमध्ये महाराष्ट्राने उत्तरेतील राज्यांसारखाच कल दाखवला आहे. पाच राज्यांमधील निवडणूक निकालांनंतर महाराष्ट्रात लोकसभेत महाविकास आघाडीला जागावाटप अवघड जाणार नाही. उलट महायुतीला अवघड जाईल. कारण भाजपला दोन पक्षांना जागा द्यायच्या आहेत. भाजपने इथे अगोदर २६ जागांवर निवडणूक लढवण्याचे ठरवले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार गटाने जागावाटपाच्या फॉर्म्युल्यावर नाराजी व्यक्त केल्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपल्या विधानापासून फारकत घ्यावी लागली होती. चार राज्यांमधील निवडणूक निकालानंतर मनोधैर्य वाढलेल्या भाजपला मित्रपक्षांची असलेली गरज थोडी कमी झाली आहे. आता मित्रपक्षांनाच भाजपची गरज आहे आणि त्यामुळे भाजप देईल तितक्या जागा पदरात पाडून घेण्याशिवाय पर्याय राहणार नाही. फडणवीस यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत सांगितलेल्या फॉर्म्युल्यापेक्षाही कमी जागा आता भाजप आपल्या मित्रपक्षांना देण्याची शक्यता आहे. याबरोबरच काँग्रेसमध्ये अस्वस्थ असलेले, पक्षनेतृत्वाच्या कार्यशैलीवर नाराज असणारे अनेक आमदार भाजपची वाट धरण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून भाजप महाराष्ट्रात गोंधळलेल्या स्थितीत गेला होता. आता हा गोंधळ संपेल आणि भाजपला बळकटी मिळेल. ताज्या मराठा आरक्षण आंदोलनानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अधिक सक्षमपणे पुढे आले होते; पण सध्या भाजपची लाट आहे आणि आपण त्याचे लाभार्थी आहोत, अशी भावना त्यांच्यामध्ये निर्माण होऊ शकते. निवडणुकांच्या निकालामुळे भाजपचा आत्मविश्वास वाढणार आहे. त्यामुळे येत्या काळात भाजप आणखी आक्रमक होऊ शकतो. जागावाटपाबाबतही भाजपची तडजोड शक्ती वाढू शकते. अधिकाधिक जागांसाठी भाजप आग्रह धरू शकतो. शिंदे आणि पवार यांनादेखील आता भाजपच्या कलानुसार घ्यावे लागणार आहे. चार राज्यांच्या निवडणूक प्रचारामध्ये फडणवीस यांनीदेखील प्रचारसभा घेतल्या होत्या. याचा त्यांना लाभ होणार आहे. केंद्रीय नेतृत्वाचा त्यांच्यावरील विश्वास वाढणार आहे. शिवाय, गेल्या काही दिवसांमध्ये फडणवीस राज्यात सावध भूमिकेत गेले होते; त्यांना नवी ऊर्जा मिळू शकते. भाजपकडून अजित पवार गटाला ताकद दिली जाऊ शकते. अशा वेळी एकनाथ शिंदे यांना भाजपचे ऐकावे लागू शकते.

अलिकडच्या काळात महाराष्ट्रात मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, नाभिक समाज आरक्षण आणि त्याला ओबीसी, आदिवासींच्या असलेल्या विरोधामुळे सामाजिक वातावरण बिघडले. आरक्षणाचे मुद्दे सोडवण्यात शिंदे यांची भूमिका महत्त्वाची होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतरही आरक्षणाच्या मुद्यावर राज्याची कायदा व सुव्यवस्था हातात घेण्याचा प्रकार घडला. नेत्यांची घरे जाळण्यापर्यंत मजल गेली. मध्य प्रदेशमधील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचे आरक्षण टिकवण्याचा फायदा भाजपला झाला. महाराष्ट्रातील आरक्षणाच्या मुद्यावर भाजपची गोची झाली होती; परंतु ताज्या निवडणुकीचे निकाल पाहता मोदींचा करिश्मा भावनिक मुद्यावरही मात करतो, हे अनुभवाला आले आहे. महाराष्ट्रातील भाजप नेत्यांनी आता सुटकेचा नि:श्वास टाकला असेल. दरम्यान, महाविकास आघाडीतील पक्षांसमोर एकमेकांची मते एकमेकांना कशी मिळवून द्यायची हे शिकण्याचे मोठे आव्हान असेल.

भाजपने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मिळवलेले हे यश त्यांच्यासाठी पुन्हा एकदा मोठ्या यशाच्या दिशेने वाटचाल करण्याची सुरुवात आहे. हा विजय मिळवण्यात मोदी यांचा महत्त्वाचा वाटा होता. भाजपने फोडाफोडीच्या राजकारणाचा नवा ट्रेंड सेट केला. फोडाफोडीच्या राजकारणामुळे भाजपचे नुकसान होते, असाही सूर राजकीय विश्लेषकांकडून उमटताना दिसत आहे; मात्र प्रत्यक्षात वस्तुस्थिती काही वेगळीच दिसते. सरकार पाडले, पक्ष फोडले, ऑपरेशन लोटस राबवले, तरी लोकांची पसंती भाजपलाच आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या निकालाने तर यावर शिक्कामोर्तब केले. २०१८ मध्ये मध्य प्रदेश भाजपने गमावले होते. कमलनाथ मुख्यमंत्री होते; मात्र ज्योतिरादित्य शिंदे यांना पक्षात घेत भाजपने मध्य प्रदेशमधील काँग्रेसचे सरकार पाडले. गोव्यातही भाजपने काँग्रेसचे दहा आमदार गळाला लावले आणि सरकार स्थापन केले. महाराष्ट्रात तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन प्रादेशिक पक्ष फुटण्यामागे भाजपचीच महाशक्ती असल्याची टीका होत आली. पण तरीही महाराष्ट्रातही भाजप सत्तेत येईल, असा कयास बांधला जात आहे.

मध्य प्रदेशमध्ये ज्योतिरादित्य शिंदे यांना काँग्रेसमधून फोडल्याचा झाला तसाच फायदा महाराष्ट्रामध्ये एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना सोबत घेतल्यामुळे होऊ शकतो, असा अंदाज बांधला जात आहे. काँग्रेस फोडली, शिवसेना फोडली, राष्ट्रवादी फोडली. सरकार पाडले, तरी जनतेच्या मनातले भाजपचे स्थान आणि मोदींची जादू कायम आहे, म्हणून मतदार भाजपाला निवडून देतात, हे वास्तव नाकारायचे कसे? सध्या कोणाचीच विरोधी पक्षात राहण्याची इच्छा दिसत नाही. त्यात जुनी प्रकरणे बाहेर निघण्याचा धाक, भीती किंवा इतर काही कारणे असू शकतात. भाजपकडे प्रचाराची मजबूत यंत्रणा आहे; पण गरज नसतानाही त्यांच्यासोबत रहावे लागणे हे भाजपचे राजकीय यश आणि विरोधकांचा पराभव आहे. जनतेची स्मरणशक्ती कमी असल्याने राज्यात पाच वर्षांपूर्वी काय झाले, हे लक्षात येत नाही. मतदार त्याचा राग मनात धरून ठेवत नाहीत. जनतेच्या मनात राग असला, तरी तो निवळू देण्याची वाट भाजप पाहतो. जितक्या निवडणुका होत जातील तितका तो राग शांत होत जाईल आणि राग निवळला तर काय होते, ते मध्य प्रदेशात दिसून आले आहे.

गेल्या काही निवडणुकांमध्ये लोकांनी स्पष्ट बहुमताचे सरकार निवडले आहे. एका ठराविक टप्प्यापर्यंत पोहोचले, तर भरघोस मते मिळतात हे स्पष्ट आहे. त्यामुळे विरोधकांना आपण स्पर्धेत आहोत आणि पर्याय देऊ शकतो, हे दाखवावे लागणार आहे. तीन राज्यांमध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवल्यानंतर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये अस्वस्थता वाढीस लागली असल्यास नवल नाही. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यामुळे काँग्रेसचा तोरा वाढला होता. लोकसभेच्या जास्त जागा पदरात पाडून घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता. त्यामुळे गेल्या आठवड्यात जाहीर झालेला जागावाटपाचा फॉर्म्युला मान्य करण्यास काँग्रेस तयार नव्हती. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला जागावाटपाचा फॉर्म्युला मान्य होता. काँग्रेसला दुसऱ्या क्रमांकांच्या जागा देऊनही ती तयार नव्हती. पाच राज्यांच्या निकालानंतर जागावाटप करू, असे काँग्रेस म्हणत होती. आता मात्र परिस्थिती एकदम बदलली. सत्तेशिवाय रहायची सवय नसलेला काँग्रेसच्या आमदारांचा गट भाजपकडे गेल्यास आता आश्चर्य वाटायला नको. तसे झाले, तर काँग्रेसला पडती भूमिका घ्यावी लागेल.

विधान परिषदेच्या जून २०२१ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसची सात ते आठ मते फुटली होती. अर्थात, त्या वेळी शिंदे यांनी शिवसेनेला खिंडार पाडून राज्यातील सरकार पाडल्यामुळे त्याकडे फारसे कुणी लक्ष दिले नाही; मात्र काँग्रेसने याची चौकशी करण्यासाठी मोहन प्रकाश समिती नेमली होती. त्याचा अहवाल केंद्रीय नेतृत्वाला देण्यात आला होता. मात्र त्यातून घरभेदी आढळलेल्या आमदारांच्या विरोधात कारवाई करण्याची हिंमत नेतृत्वाने दाखवली नाही. आता तीन राज्यांमधील दमदार विजयानंतर त्या आम दारांसह आणखी काही मोठे नेते भाजपच्या गळाला लागणार असल्याची भीती काँग्रेसच्याच गोटातून व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसम धील अजित पवार गटालाही ताज्या निकालांमुळे मोठे बळ मिळाले आहे.

अजित पवार यांनी घेतलेला निर्णय किती योग्य होता, हेच यातून सिद्ध झाल्याचे त्यांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शरद पवार यांच्यापाशी उरलेल्या थोडक्या आमदारांमध्ये चलबिचल आहे. शरद पवार यांच्याशी एकनिष्ठता दाखवणाऱ्या आमदार, खासदारांपैकी अनेकांनी यापूर्वीच अजित पवार यांना समर्थन असल्याची शपथपत्रेही सही करून दिली होती. त्यामुळे पवार यांच्यापाशी उरल्यासुरल्या आमदारांनाही गळती लागण्याची दाट शक्यता आहे. दुसरीकडे, उद्धव ठाकरे भाजपविरोधात नव्या उमेदीने रणांगणात उतरायचा प्रयत्न करत असल्यानेही त्यांच्या मनातील धाकधूक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात भाजपला 'अच्छे दिन' येऊ शकतात.

आजकाल

प्राचीन भारतातील प्रचंड संपत्ती

सुनील तांबे

युरोपियनांच्या आक्रमणापर्यंत भारत नावाचा देश कमालीचा मागासलेला होता, कोणतंही ज्ञान, तंत्रज्ञान इथे विकसित झालेलं नव्हतं. जातिव्यवस्थेने हा समाज पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला होता, अशी मांडणी पुरोगामी वर्तुळात (मार्क्सवादी, आंबेडकरवादी, फुलेवादी) वारंवार केली जाते.

वस्तुस्थिती काय आहे?

केरळमधील राजा मार्तंड वर्माने १७७१ साली झालेल्या लढाईत डचांचा पराभव केला आणि त्यानंतर तो आणि त्याच्या वारसांनी सदर राज्य भगवान विष्णूला समर्पित केलं. तिरुवअनंतपुरम शहरातील श्री पद्मनाभस्वामी मंदिराला उदारहस्ते दान दिलं. आजही या मंदिराच्या व्यवस्थापनाच्या ट्रस्टवर या राजाचे वंशज पद्मनाभाचे दास म्हणून देखरेख करतात. हे मंदिर राजकुटुंबाचं खाजगी मंदिर असल्याचा त्यांचा दावा केरळ उच्च न्यायालयाने फेटाळला आणि या मंदिराच्या व्यवस्थापनासाठी राज्य सरकारने ट्रस्ट स्थापन करावा असा आदेश दिला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली, मंदिराच्या खजिन्याची मोजदाद करून त्याच्या तपशीलवार नोंदी करण्याचे अधिकार तपासअधिकाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेशात दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार श्री पद्मनाभस्वामी मंदिरातील खजिना २०११ साली उघडण्यात आला.

श्रीविष्णूची चार फूट उंच, तीन फूट रुंद शुद्ध सोन्याची रत्नजडित मूर्ती, १८ फूट उंचीच्या मूर्तीचं शुद्ध सोन्याचं सिंहासन शेकडो हिरे आणि रत्नांनी मढवलेलं, सण-उत्सवात मूर्तीला चढवायचा ३० किलो वजनाचा शुद्ध सोन्याचा पोषाख, हजारो सोन्याच्या साखळ्या, त्यामध्ये एक साखळी १८ फूट लांबीची, ३६ किलो वजनाचा सोन्याचा पडदा, ५०० किलो वजनाचा सोन्याच्या नाण्यांचा ढिगारा, १२०० रत्नजडित नाणी, सोन्याच्या वस्तू, हार, हिरे, माणिक, पाचू अशा रत्नांनी भरलेल्या अनेक पिशव्या, रोमन साम्राज्यातील हजारो नाणी, त्याशिवाय मध्ययुग आणि १८ व्या शतकातील युरोपियन देशांमधील नाणी. या खजिन्याची एकूण मूल्य २० अब्ज डॉलर्स असावं असा अंदाज आहे.

सुती व रेशमी वस्त्रांना पूर्व आशियायी देश आणि युरोप-अमेरिकेतूनही प्रचंड मागणी होती. चम कदार रंगांच्या वेलबुट्ट्या आणि नक्षीकाम असणारे कापडाचे पडदे, पलंगपोस कमालीचे लोकप्रिय होते. कारण तशी सूतीवस्त्रं आणि चमकदार रंग आणि नक्षीकाम युरोपात नव्हतं. चिंट्झ आणि कॅलिको या प्रकारची कापडं होती. चिंट्झच्या वस्त्रालाही झळाळी असायची.

भारतातली सुती व रेशमी वस्त्रं, मसाले, मोती, हिरे व रत्नं, कापूर, चंदन यासारखी सुगंधी पदार्थ यांच्या बदल्यात देण्यासाठी कोणतंही उत्पादन युरोपियन देशांकडे नव्हतं. त्यामुळे या सर्व वस्तुंची किंमत त्यांना सोन्याचांदीमध्येच चुकती करावी लागायची. हिंदुस्तानात मोठी शहरं आहेत, प्रासाद आहेत, नद्या आहेत, भरपूर लोकसंख्याही आहे परंतु भारतीयांना युरोपातील कोणत्याही वस्तूंमध्ये वा कापडांमध्ये काडीमात्र रस नाही, या उत्पादनांना तिकडे मागणी नाही.

त्यांच्या सर्व मालाची किंमत ते सोन्या चांदीमध्येच मागतात, या शब्दांत आपल्या सफरीचा वृत्तांत वास्को द गामाने पोर्तुगालच्या राजाला कथन केला. दक्षिण अमेरिकेतील खाणींमधून मिळालेलं सोनं आणि रुपं अशा प्रकारे हिंदुस्तानात दाखल झालं. सतराव्या शतकातला फ्रेंच प्रवासी, फ्रांस्वाज बर्निअर औरंगजेबाचा डॉक्टर होता. त्याच्या नोंदीनुसार, सोनं आणि चांदी जगाच्या विविध प्रदेशांतून हिंडत अखेर हिंदुस्तानात गिळंकृत होते. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत भारतात सोन्याचांदीची आवक होत होती यावर पद्मनाभ मंदिरातील खजिना शिक्कामोर्तब करतो.

व्हायरल

भिकार सिनेमे का यशस्वी होतात?

शिरीष कणेकर ह्यांनी एकदा लिहिले होते.....

नसीर किंवा संजीवकुमार हे दोघे न आवडणारा रसिक दुर्मिळ, सगळेच ह्या दोघांच्या बद्दल भरभरून बोलतात, अभिनयाचे कौतुक करतात.

मग मला प्रश्न पडतो, इतकी रसिकमान्यता असणाऱ्या ह्या नटांचे सिनेमे का फ्लॉप जातात? खरतर तुफान हिट व्हायला हवेत, इतके लोकप्रिय आहेत तर....

मग मला एकदा उत्तर मिळाले, लोक 'देशप्रेमी' बघून, अत्यंत भिकार आहे असे म्हणतात, आणि 'स्पर्श' उत्तम आहे, असे ऐकलंय म्हणतात.

थोडक्यात, स्वतःची अभ्यासू किंवा चोखंदळ वृत्ती दाखवायला, संजीव किंवा नसीर चे नाव ठोकून देतात,पण पैसे खर्च करून सिनेमा बघायची वेळ येते, त्यावेळी मात्र अमिताभ किंवा मिथुन किंवा असाच कोणत्यातरी हुकमी मनोरंजन होईल, अशी खात्री असणाऱ्याचे सिनेमे बघतात.

तसेच मला वाटते, लोक धो धो ऍनीमल ला शिव्या घालत आहेत, पण तो बघून मग शिव्या घालतात, म्हणून तो ५०० कोटी कमावतो.

आणि १२ फेल, किंवा सॅम बहादुर किंवा असेच इतर छान सिनेमे, न बघताच, इतर काही म्हणतात म्हणून, कौतुक करून, स्वतःची उच्चअभिरुची सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात

अन्यथा, पुष्पा , ऍनिमल सारखे भिकार सिनेमे इतके हिट होतातच कसे??? आणि उत्तम सिनेमे २ आठवड्यात थेटर मधून जातात कसे??

असो....

सर्व मित्रांना अल्फा मेल होण्यासाठी उदंड शुभेच्छा

मी काल एक, अनुभवनिष्ठ आणि प्राणीप्रेमी लोकांच्यात सर्वांना माहिती असणारे विधान केले होते....

''कुत्रा मालकावर/माणसांवर प्रेम करतो, तर मांजर हे, घरावर प्रेम करते.''

आता माझ्या ह्या विधानावर, एक फूलो की मलिका (ला फक्त फुलं आहेत, म्हणून फूलो की मलिका)

म्हणाली....

''मांजराला असे कोणीही आवडत नसते, खरोखरच आवडू शकणारा व्यक्ती असेल, तरच आवडतो, मांजरीला तुम्ही आवडत नसाल, तर तुमच्या व्यक्तीमत्वात काही मेजर प्रॉब्लेम आहे, हे समजून जा.''

हे वाचले आणि मी थिजूनच गेलो. कावळा जसा, माणसांच्या इच्छा आकांक्षावर लक्ष ठेवून असतो आणि त्यानुसार पिंडा बद्दल निर्णय घेतो

तशीच काहितरी अतेंद्रिय शक्ती मांजरीत असते

मी कल्पनाचित्र रंगवू लागलो, समाजात जर ही गोष्ट सगळ्यांना समजली,तर माणसे ओळखण्याचे निकषच बदलतील. डॉन मधे जसे अमिताभ, गोळी घातल्यावर म्हणतो ''उस के जुते मुझे पसंद नही थे''

तसेच बॉस म्हणेल, उस को मैने निकाल दिया क्यो की मेरी बिल्ली को वो पसंत नही था

मुलगी बघायला जाताना, मुलगा आणि मुलगी स्वतःच्या घरच्या माऊ घेऊन येतील, आणि मुलाच्या माऊ ला मुलगी आणि मुलीच्या माऊ ला मुलगा आवडला,तरच लग्न जमेल. माऊंनी आकर्षित व्हावे म्हणून, कॅटफूड च्या वासाचे निघतील.

एका ही मांजराला मी आवडत नाही, म्हणून डिप्रेस होणाऱ्या लोकांसाठी, वेगळे दवाखाने बांधावे लागतील

मेरे पास माँ है ऐवजी, मेरे पास, मी आवडणारी माऊ है.... असे संवाद लिहावे लागतील

म्हणून मला खूप आवडते, इकडे जीवणा कडे वेगळ्या दृष्टीने बघायला शिकवणारे आणि जीवण समृद्ध करणारे, भरपूर लोक भेटतात. चाललो आता, माऊंची माऊधरणी सॉरी मनधरणी करायला.

- केदार सोमण

लोकसंसद

पालक व नातेवाईकांना दिलासा

मुलांच्या शाळा,कॉलेजच्या फी व रुग्णालयांची मोठी बिले आता युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय)च्या माध्यमातून अधिक सुलभ आणि सुकर होणार आहेत.आतापर्यंत एकलाख मर्यादा असलेल्या ह्या प्रणालीची मर्यादा पाचलाख करण्यात आली आहे.

रिझर्व्ह बँकेने ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने आणि विद्यार्थी व रुग्णांच्या नातेवाईकांना हे खूप सोयीस्कर



आणि सुलभ होणार आहे.सध्या यूपीआय प्रणालीचा सर्रासपणे वापर करण्यात येतो.अशा यूपीआय पेमेंट्सची वेळोवेळी पडताळणी रिझर्व्ह बँकेच्या मार्फत केली जाते. विद्यार्थ्यांचे पालक व रुग्णांचे नातवाईक यांना या निर्णयाचा दिलासा मिळणार आहे.लोकांमध्ये सध्या यूपीआय पेमेंट्स लोकप्रिय आहेत कारण खिशात रोख रक्कम ठेवण्याची गरज नाही तसेच पाकीट नसेल तरी चालेल परंतु, स्मार्ट फोन हवा कारण हा स्मार्ट फोन सर्व पेमेंट्स स्कॅन करून पेमेंट्स करतो. अशा छोटे किरकोळ वापरकर्ते म्हणजेच आवर्ती पेमेंट्सची मर्यादा पंधरा हजारावरून एक लाख करण्यात आलेली आहे. पेमेंट्स करिता सुलभ आणि सोयीस्कर अशा यूपीआय पेमेंट्सच्या मर्यादा वाढवून रिझर्व्ह बँकेने विद्यार्थ्यांचे पालक व नातेवाईकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई

प्रेरणा

हनुमंत महाबळी

हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ।।१।।
तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ।।ध्रु.।।
करोनी उड्डाण । केलें लंकेचें शोधन ।।२।।
जाळीयेली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ।।३।।

अर्थ :

महाबलवंत, महापराक्रमी अशा हनुमंताने रावनाची दाढी जाळली होती .त्यांना मी वारंवार, निरंतर नमस्कार करतो. महान अश्या समुद्रावर उड्डाण करुण लंकेचे निरिक्षण केले. तुकाराम महाराज म्हणतात, रावणाची लंका ज्याने जाळली, त्या मारुतिरायाचा पराक्रम धन्य होय.

तुकाराम महाराजांच्या कोणत्याही अभंगाचा अर्थ वाचण्यासाठी सार्थ तुकाराम गाथा हे ॲप नक्की डाऊनलोड करा

(अभंगक्रम ह.भ.प. देवडिकर म. पारायण पद्धती प्रमाणे)

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

११ डिसेंबर

१) श्रीम.शुभदा भालचंद्र म्हात्रे
मु. शिरवली, पो. हाशिवरे
११-१२-१९४१

२) श्री. विजय शंकर पुळेकर
ब्राह्मणआळी, अलिबाग
११-१२-१९५२

३) श्री. विष्णु महादेव मगर,
वेश्वी, अलिबाग
११-१२-१९३३

४) श्रीम. रेखा लक्ष्मण घरत
नागडोंगरी, अलिबाग
११-१२-१९५२

५) श्री. विजय पांडुरंग पाटील
नवगाव, अलिबाग
११-१२-१९५५

६) श्रीमती शुभांगी वामन म्हात्रे
पिंपळभाट, अलिबाग
११-१२-१९५९

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कु.डॉ.अमी राजेश मारू, २६वा वाढदिवस, मुंबई

श्री. विष्णु महादेव मगर, ९० वा वाढदिवस, वेश्वी, अलिबाग

स्व. शांताराम कमळ माळवी, स्मरणार्थ, धोकवडे, अलिबाग

कृषी योजनांचा लाभ घ्या

उपविभागीय कृषी अधिकारी आनंद कांबळेंचे आवाहन

। चणेरा । प्रतिनिधी ।

शेतकऱ्यांसाठी भरभरून कृषी योजना आहेत. त्या सर्व योजनांचा शेतकरी बांधवांनी परिपूर्ण लाभ घेतला पाहिजे. रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानने सर्वच शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करत कृषी चळवळ उभी केली. संबंध तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. उपस्थितांमध्ये तरुण शेतकरी पाहिल्याने कृषी चळवळ अधिक प्रगल्भ होईल, असे प्रतिपादन उपविभागीय कृषी अधिकारी आनंद कांबळे यांनी केले. शेतकरी विकास प्रतिष्ठान आयोजित कृषी दिनदर्शिका २०२४ प्रकाशन, शेतकरी सन्मान, कृषी प्रदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते.

रोहा येथील भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात कृषीसंबंधी विविध पर्वणी कार्यक्रमाला व्यासपीठावर स्मार्टचे उपसंचालक सतीश बोराडे, कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. मनोज तलाठी, यंग युनिटीचे अध्यक्ष डॉ. फरीद चिमावकर, सिटीझन फोरमचे अध्यक्ष आप्पा देशमुख, कृषी अधिकारी महादेव करे, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, शेतकरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, कृषी पूरकचे राहुल जोशी, मजूर फेडेरेशनचे चेअरमन हेमंत ठाकूर, दीपक फाऊंडेशनचे अजय आव्हाडे, बळिराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, कृषी अधिकारी अशोक दांडेकर, गडकिल्ले अभ्यासक सुखद राणे, कळसगिरी प्रकल्पाचे सुरेंद्र निंबाळकर, शेती उद्योजक नितीन पिंपळे, अधिकारी उपस्थित होते.

रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठान आयोजित शेतकरी सन्मान, कृषी महोत्सव कार्यक्रमात सेंद्रिय, मत्स्यशेती फार्म पर्यटन, कलिंगड, भाजीपाला, शेळीपालन, प्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय, नदी पर्यटन विविध कृषी क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी केलेल्या चंद्रकला खेरटकर, सुशांत मोरे, ऋषीकेश म्हात्रे, अदिती थिटे, केशव खरीवले, अमित गायकवाड, नितीन पिंपळे, सूरज दहिंबेकर, विजय लोरणकर, किरण महाबळे, रवींद्र राऊत, महादेव सकपाळ, राकेश लोखंडे, राहुल जोशी, भरत पाटील, पांडुरंग भेरे, राजेंद्र जाधव, ज्ञानेश्वर थिटे, रघुनाथ कडू, जितेंद्र जोशी आदी शेतकऱ्यांना शेतकरी सन्मान देऊन गौरविण्यात आले.

कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. मनोज तलाठी यांनी किल्ला येथील विज्ञान केंद्राला भेट द्या, तंत्रज्ञान पाहा, तंत्रज्ञान वापरणे काळाची गरज आहे. सेंद्रीय शेतीकडे वळा. यापुढे ९ डिसेंबर कृषी चळवळ दिन साजरा करावा असे काम शेतकरी विकास प्रतिष्ठानचे आहे. तुम्ही एक पाऊल पुढे टाका, आम्ही ९९ टक्के सहकार्यासाठी तत्पर आहोत, असा विश्वास दिला. स्मार्टचे उपसंचालक यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी महोत्सवाला शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली. यावेळी कृषी दिनदर्शिका २०२४ चे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गणेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष अनंत मगर, पांडुरंग भेरे, संतोष दिवकर, धनंजय जोशी, खेळू थिटे, सतीश मगर, विनोद पाटील, गोपीनाथ गंभे, दगडू बामुगडे, प्रशांत धामणसे व पदाधिकाऱ्यांनीही परिश्रम घेतले.

> आमचे कृषी ध्येय मोठे आहे. सबंध तालुक्यात कृषी चळवळ उभी करायची आहे. आज जे काही यश आहे, त्याचे श्रेय शेतकऱ्यांना आहे. रोहा कृषी विभागाला अधिकारी चांगले मिळालेत. प्रत्येक अडचणीत मार्ग दाखवतात. यापुढे आपण सर्व शेतकरी एकत्र काम करू या, चळवळ अधिक भक्कम उभी राहील.
>
> - गणेश भगत, अध्यक्ष, शेतकरी विकास प्रतिष्ठान

नानासाहेब पेशवे जयंतीच्या व्दिशताब्दी वर्षाची सुरुवात

। कर्जत । प्रतिनिधी ।

परकीय ब्रिटिश सत्तेला आव्हान देणाऱ्या अठराशे सत्तावन्नच्या स्वातंत्र्य युद्धातील सेनानी नानासाहेब पेशवे यांच्या जयंतीच्या व्दिशताब्दी वर्षाला कर्जत तालुक्यातील वेणगाव या जन्मस्थानी शुक्रवार, दि.८ डिसेंबर रोजी सुरुवात झाली.

नानासाहेब पेशवे दुसरे यांचे कार्यकर्तृत्व सर्वत्र पोहोचवण्यासाठी नानासाहेब पेशवे जयंती व्दिशताब्दी स्मृती समिती, वेणगाव स्थापन करण्यात आली आहे. या समितीतर्फे जन्मदिनाच्या दिवशी कार्यक्रम करण्यात आला. वेणगाव ग्रामपंचायत येथे नानासाहेब पेशवे यांच्या तैलचित्राचे अनावरण अश्विनी पालकर, इतिहास अभ्यासक मोहन शेटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समितीचे अध्यक्ष विवेक सुर्वे, उपाध्यक्ष भाई गायकर, सचिव रमेश मुंढे, सदस्य नितीन कांदगावकर, अनंत हजारे उपस्थित होते.

ग्रामपंचायत सदस्य सुभाष गवळी, रवींद्र सोनवणे, दीपक कांब्री, आनंद वाघमारे, ग्रामसेवक जाधव कार्यक्रमात सहभागी झाले होते. तसेच, अभिनव ज्ञान मंदिर, कर्जत आणि विद्या विकास शाळा, नेरळ येथे विद्यार्थी आणि शिक्षक आणि संस्था पदाधिकारी यांच्यासाठी नानासाहेब पेशवे कार्य आणि कर्तृत्व यावर मोहन शेटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

समितीतर्फे रायगड, ठाणे जिल्ह्यासह पुणे, नाशिक आदी राज्याच्या विविध भागात डिसेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ दरम्यान नानासाहेब पेशवे स्मृती जागरणाचे विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष विवेक सुर्वे यांनी दिली.

बेलदार समाज मंत्रालयावर धडकणार

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांची पूर्तता व्हावी यासाठी ऐन हिवाळी अधिवेशनात सकल बेलदार समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने आरपारची लढाई सुरू केली आहे. प्रचंड एकजूट आणि ताकतीने एकत्र येत ९ डिसेंबरला महाराष्ट्रातील संपूर्ण बेलदार समाज आपल्या कुटुंबासह पुणे ते मुंबई मंत्रालयाच्या दिशेने पायी निघाला आहे. रायगडातील हजारो कार्यकर्त्यांचा पदयात्रेत सहभाग घेतला आहे. आता जीव गेला तरी बेहत्तर, बेलदार समाजाच्या मागण्या मान्य होईपर्यंत मागे हटणार नाही, अशी आक्रमक भूमिका सकल बेलदार समाजाने घेतली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री सर्व आंदोलक समाज घटकांना भेटून त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या सकारात्मक भूमिकेतून आश्वासन देतात, मात्र बेलदार समाजाकडे सरकार कायम दुर्लक्ष करीत आले आहे. बेलदार आंदोलकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेटावे आणि त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी आग्रही मागणी बेलदार समाजाने केली आहे. महाराष्ट्रातील किल्ले, घर, वाडे यांसाठी घडीव दगड, तोडी

- **विविध मागण्यांसाठी पुणे ते मुंबई पायी यात्रा**
- **रायगडातील हजारो कार्यकर्त्यांचा सहभाग**

बनवणारा बेलदार समाज आजही अत्यंत, कष्टप्रद, संघर्षमय आणि भटकंतीचे जीवन जगतोय. बेलदार समाजातील अनेक कुटुंबं आजही गावाकुसाबाहेर शेतात झोपड्यांमध्ये वास्तव्य करीत आहेत. या उपेक्षित समाजाला शासनाकडून मूलभूत, पायाभूत, नागरी सेवा सुविधा मिळाव्यात यासाठी बेलदार समाज आक्रमक झाला आहे. इतर राज्यांमध्ये बेलदार समाजाला ज्या सुविधा मिळतात, त्या महाराष्ट्रात मिळाव्यात, जातीच्या दाखल्याकरिता ६१ च्या रहिवास पुराव्याची अट रद्द करावी, हक्काची घर आणि पारंपरिक व्यवसाय म्हणून दगड खाणींची रॉयल्टी माफ व्हावी, अशा महत्त्वपूर्ण मागण्या बेलदार समाजाकडून केल्या जात आहेत. आमचा लढा आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत सुरूच राहील, असा इशारा बेलदार समाज नेते रवींद्र चव्हाण यांनी दिला आहे.

दिल्लीच्या पेन्शन समितीत सकारात्मक मुद्द्यांवर चर्चा

। उरण । वार्ताहर ।

पेन्शन समितीची पहिली बैठक आयपीए, न्यू दिल्ली येथे सहा फेडरेशन आणि व्यवस्थापन यांच्यात जी.पी. राय, अध्यक्ष, मुरगांव बंदर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत वेतन करार बैठकीत इतर अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आणि चर्चेसाठी शिफारस करण्यात आली. वेतन करारची पुढील बैठक १८ डिसेंबर रोजी दुपारी २.३० वाजता मुंबई येथे होणार आहे, अशी माहिती सुरेश पाटील, महासचिव भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ यांनी दिली. यावेळी कार्याध्यक्ष सुधीर घरत यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पेन्शन नियमच्या बाबतीत समिती सदस्यांनी एकमताने शिफारस केली आहे की, प्रमुख बंदरांचे पेन्शन नियम सीसीएस (पेन्शन) नियमांनुसार

तयार केले जातील. पेन्शन आणि फेमिली पेन्शन अद्यतनित करणे या बाबतीत १ जानेवारी २०२२ पूर्वी सेवानिवृत्त/मृत्यू झालेल्या पोर्ट आणि डीएलबीची पेन्शन आणि फेमिली पेन्शन, वेतन मंडळानुसार पेन्शनदेण्यात यावी असे मान्य करण्यात आले. अपंग भावंडांना फॅमिली पेन्शन देण्याबाबत सीसीएस (पेन्शन) नियमांनुसार सहमत झाले. एआईसीपीआई तिमाही निर्देशांक सरासरी वाढीनुसार महागाई सवलत दिली जाईल. सेवानिवृत्ती/मृत्यू ग्रॅच्युइटीबाबतीत जेव्हा जेव्हा डीए ५० टक्क्यांनी वाढेल, तेव्हा ते २५ टक्के वाढेल. पेन्शन फंडाचे व्यवस्थापन पोर्टद्वारे करावे.पेन्शन अदालतबाबतीत सर्व बंदरांनी एक समिती गठीत करावी आणि त्रैमासिक बैठक घ्यावी. निश्चित वैद्यकीय भत्ता रु.१०००/- वरून रु.२०००/- पर्यंत वाढवले. अपंग अवलंबित मुलांना वैद्यकीय लाभ मिळणार. एनपीएएसच्या बाबतीत जेव्हा केंद्र सरकार एनपीएस २००४ चे उदारीकरण करेल, २०१७ पूर्वी एसवीआरएस अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या गोवा बंदरातील कर्मचाऱ्यांना एमपीटीच्या वैद्यकीय योजनेंतर्गत नोंदणी करण्याची परवानगी दिली जाईल. अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा झाली.

दाजी गडहिरे यांची निवड

लांजा : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या सोशल मीडिया फ्रंटच्या रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी लांजा येथील दाजी गडहिरे यांची निवड करण्यात आली आहे. दाजी गडहिरे हे गेली अनेक वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करत आहेत. यापूर्वी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस लांजा तालुका सामाजिक न्याय सेल तालुकाध्यक्षपदाची धुरा यशस्वीरित्या सांभाळली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फुट पडल्यानंतरही ते पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिले आहेत. याची दखल घेऊन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व सोशल मीडिया फ्रंटचे प्रदेशाध्यक्ष महादेव बालगुडे यांनी दाजी गडहिरे यांची सोशल मीडिया फ्रंटच्या रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीचे पत्र महादेव बालगुडे यांनी दाजी गडहिरे यांना दिले आहे. या निवडीबद्दल दाजी गडहिरे यांचे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले.

साटवलीत बिबट्याचे दर्शन

लांजा : लांजा साटवली मार्गावर गोळवशी ते बापेरेदरम्यान दिवसाढवळ्या वाहन चालक आणि ग्रामस्थांना बिबट्याचे दर्शन झाले. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लांजा साटवली मार्गावर साटवलीतील रहिवासी जितेंद्र चव्हाण यांनी यावर माहिती देताना सांगितले, की या मार्गावर अनेकदा ग्रामस्थ आणि वाहन चालकांना बिबट्याचा मुक्त संचार पहावयास मिळतो. त्यामुळे ग्रामस्थ आणि वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आजपासून रत्नागिरीत बागायतदारांचे आंदोलन

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

कोकणातील शेतकऱ्यांना स्वातंत्र्यानंतर कधीही कर्जमाफी, सरसकट नुकसानभरपाई दिलेली नाही. आंबा, काजू हे येथील मुख्य पीक, कोकणची अर्थव्यवस्था या पिकांवर चालते. तरीही येथील आंबा-काजू बागायतदारांची कर्जमुक्ती व सातबारा कोरा शासनाने केलेला नाही. अल्पप्रमाणात रक्कम देऊन आमची फसवणूक आता सहन न करण्याचा इशारा देण्यात आला आहे. चालू हिवाळी अधिवेशनात शासनाने योग्य निर्णय घेण्यासाठी ११ डिसेंबरपासून रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर येथील बागायतदार शेतकरी उपोषण छेडणार आहेत.

शासनाने आता प्रत्येक कलमामागे १५ हजार रुपये या प्रमाणे सरसकट शेतकर्यांना मदत द्यावी. या प्रमुख मागण्यांसह अन्य मागण्यांकडे लोकप्रतिनिधी आणि शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी ११ डिसेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण केले जाणार आहे. त्यानंतर जे काही परिणाम होतील त्याला शासन जबाबदार असेल, असा इशारा कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादक विक्रेते सहकारी संस्था मर्यादित संस्थेचे प्रकाश साळवी, मुकुंद जोशी, रामचंद्र देसाई, मंदार जोशी, जगन्नाथ पाटील यांच्यासह अनेक आंबा बागायतदारांनी दिला आहे.

पायी दिंडीला १०० वर्षांची परंपरा

। रसायनी । राकेश खराडे ।

भागवत धर्माचार वारकरी संप्रदाय सामुदायिक मंडळ या आळंदी पायी वारी दिंडीला १०० वर्ष पूर्ण झाली असून, वारकऱ्यांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे.

१०० वर्षांपूर्वी चिद्घन स्वामी सखाराम महारा यांनी परिसरातील वारकरी भक्तगण यांना घेऊन आळंदी कार्तिक एकादशी पायी वारी सुरू केली. आळंदीला पायी वारी जाताना खालापूर तालुक्यातील चौक वावंढळवाडी येथे काईनकर परिवारात त्यांचा मुक्काम सुरू झाला. या मुक्कामालादेखील १०० वर्ष पूर्ण झाली. यावर्षी आळंदी पायी वारी जाताना येथे वारकरी आनंद उत्सव साजरा करण्यात आला. पंचक्रोशीतील अनेक वारकरी भक्तगणांनी यावेळी उपस्थित राहून या दिंडीचे भव्य स्वागत केले. प्रवचन, कीर्तन, महाप्रसाद, रात्री जागर आणि पहाटे काकडा आरती करून दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान झाले.

यावेळी श्री भागवत धर्माचार वारकरी संप्रदाय मंडळाचे अध्यक्ष कृष्णा पाटील यांनी काईनकर परिवाराचा आभार सत्कार केला, तर दिंडीची सेवा करण्यास मिळाल्याने मंडळाचा सत्कार कमलाकर काईनकर व परिवाराने केला. मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. युवा कीर्तनकार संदीपमहाराज यादव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन रामदास काईनकर व ग्रामस्थांनी केले. यावेळी १०० वर्षांची आठवण म्हणून उपस्थितांना भेटवस्तू देण्यात आली.

आशा, गटप्रवर्तकांचा १८ डिसेंबरला मोर्चा

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

आशा व गटप्रवर्तक यांच्या विविध प्रलंबित मागण्या मंजूर झाल्या असल्या तरी याबाबत लेखी आदेश शासनाने अजूनही काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नागपूर विधानसभेवर १८ डिसेंबर रोजी मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती सघटनेचे राज्याध्यक्ष शंकर पुजारी यांनी दिली.

गेली अनेक वर्षे आशा व गटप्रवर्तक महिला आपल्या विविध मागण्यांसाठी वारंवार आंदेलने करीत आहेत. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. गेल्या महिन्यात पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत राज्यातील ७२ हजार आशा व ३६७२ गटप्रवर्तक १८ ऑक्टोबर २०२३ पासून संपावर होत्या. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी आशांना ७ हजार रुपये व गटप्रवर्तकांना ६ हजार २०० रुपये वाढ व आशा व अटप्रवर्तकांना २ हजार रुपये दीपावली भेट जाहीर केली होती. मात्र, याबाबत लेखी आदेश अजूनही निघालेले नाहीत. याचा असंतोष निर्माण झाला आहे. हे लेखी आदेश लवकरच निघण्यासाठी संघटनेने पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. १८ डिसेंबर रोजी नागपूर अधिवेशनावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. हा मोर्चा सकाळी ११ वाजता नेहरू यांच्या उद्यानापासून नागपूर अधिवेशनावर काढण्यात येणार असल्याचे शंकर पुजारी यांनी सांगितले.

एचसीएएचचे पहिले ट्रांझिशन केअर केंद्र नवी मुंबईत सुरू

। पनवेल । प्रतिनिधी ।

अग्रगण्य हॉस्पिटलबाह्य शुश्रुषा कंपनी असलेल्या एचसीएएच या कंपनीने महाराष्ट्रातील पहिले ट्रांझिशन केअर केंद्र (टीसीसी) खारघर येथे सुरू करण्याची घोषणा केली आहे. या माध्यमातून एचसीएएचचा पश्चिम भारतात प्रवेश केला आहे. नवी मुंबई आणि जवळपासच्या भागातील लोकांना विविध सेवा प्रदान करून दर्जेदार आरोग्य सेवा मिळतील याची हमी देणे, हे टीसीसीचे उद्दिष्ट आहे. यामध्ये दीर्घकालीन गहन शुश्रुषा, कुशल नर्सिंग, जेरियाट्रिक केअर आणि आंतररुग्ण पुनर्वसन यांचा समावेश आहे.

टाळता येण्याजोगे अपंगत्व कमी करणे आणि एका जागी खिळलेल्या लोकांना हालचाल करण्यास सक्षम करणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. संसर्गविरहित अशा या नवी मुंबई केंद्राची क्षमता ४० रूग्णांची असून, येथे डॉक्टर, कुशल परिचारिका आणि प्रशिक्षित आरोग्यसेवा व्यावसायिक सदैव

उपलब्ध असतील. या केंद्रात ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेनंतरच्या काळजीची गरज आहे किंवा स्ट्रोक, मणक्याचे दुखापत, ट्रॉमा, पार्किन्सन्स, अल्झायमर आणि इतर अशा आजारातून बरे होत आहेत अशा रुग्णांना सेवा दिली जाईल.

यावेळी एचसीएएचचे संस्थापक आणि सीईओ विवेक श्रीवास्तव म्हणाले की, भारतात रिहॅब केअरची बाजारपेठ मोठी असून, तिचे मूल्य अंदाजे ३२ अब्ज डॉलर एवढे आहे, असे ताजे अहवाल आहेत. त्यामुळे रूग्णालयाच्या मर्यादेपलीकडे सेवा देणाऱ्या ट्रांझिशन केअर केंद्रांच्या मागणीत वाढ झाली आहे.

एचसीएएच इंडिया संपूर्ण शुश्रुषा क्षेत्रात पसरलेले सर्वसमावेशक हेल्थकेअर वितरण

- **दर्जेदार आरोग्य सेवेची हमी**
- **४० रुग्णांवर एकाच वेळी उपचार शक्य**

मॉडेल आणून या वाढत्या गरजा पूर्ण करेल तसेच प्रत्येक पाऊल पुढे टाकताना एचसीएएच संपूर्ण देशात आणि इतरत्रही दर्जेदार शुश्रुषा आणण्याच्या उद्देशाने रुग्ण-केंद्रित दृष्टिकोन अवलंबत आहे.

अत्याधुनिक पायाभूत सुविधा, उपकरणे आणि उच्च प्रशिक्षित हेल्थकेअर व्यावसायिकांनी सज्ज असलेले हे नवी मुंबईतील नवीन केंद्र ग्राहकांच्या वेदनांचे निराकरण करण्यासाठी कार्य करेल.

भाजपचे काँग्रेसविरोधात जोडे मारो आंदोलन

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे हिंदुत्व हेच आमचे हिंदुत्व आहे. वीर सावरकर हे देशाची व रत्नागिरीकरांची अस्मिता आहेत. त्यामुळे वीर सावरकरांचा अपमान आम्ही सहन करणार नाही, असे प्रतिपादन भाजपाचे विधानसभा क्षेत्रप्रमुख, माजी आ.बाळ माने यांनी जोडे मारो आंदोलनाप्रसंगी केले.

स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसचा धिक्कार असो, प्रियांक खर्गे मुर्दाबाद, अशा घोषणा देत भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर शुक्रवारी (दि.८) निषेध आंदोलन करण्यात आले. बाळ माने यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, देशभरात, भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. वीर सावरकरांचा अपमान आम्ही कोणत्याही स्थितीत सहन करणार नाही. यावेळी काँग्रेसविरोधी घोषणा देण्यात आल्या. खर्गे यांच्या वक्तव्यामुळे नवा

खर्गे यांच्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद

वाद निर्माण झाला. खर्गे यांच्या वक्तव्यावर भाजपने तीव्र नाराजी व्यक्त केली.

भाजयुमो जिल्हाध्यक्ष डॉ. ऋषिकेश केळकर यांच्या नेतृत्वात आंदोलनाला युवा मोर्चा प्रदेश चिटणीस विक्रम जैन, शहराध्यक्ष राजन फाळके, शहर सरचिटणीस मंदार खंडकर, जिल्हा चिटणीस राजू भाटलेकर, राजापूर (पश्चिम) महिला मोर्चा तालुकाध्यक्षा सुयोगा जठार, मनोज पाटणकर, प्रमोदशेठ खेडेकर, संदीप (बाबू) सुर्वे, बापू गवाणकर, राजू महाकाळ, युवा मोर्चा शहराध्यक्ष सिद्धाय मयेकर, निरंजन जठार, सोहम खानविलकर व पमू पाटील, अतिफ काझी, शिवानी दुदम, चिन्मय शेट्ये, गौरव जाधव आदींसह भाजपा कार्यकर्ते यांनी निषेध नोंदवला.

क्रशरमुळे जीव गुदमरतोय

वायू प्रदूषणाने नागरिकांच्या आजारात वाढ; कारवाई करण्याची मागणी

। उरण । वार्ताहर ।
तालुक्यातील दगड क्रशरमुळे होत असलेल्या वायूप्रदूषणाने नागरिकांचा जीव गुदमरत असून, ते पुरते हैराण झाले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परिपत्रकात स्पष्टपणे सूचना केलेल्या असताना एकाही सूचनेचे पालन दगड खाणीचे चालक करत नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असून, नागरिकांना श्वसनाच्या आजारांना बळी पडावे लागत आहे. यावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी वहाळ ग्रामपंचायतीने प्रदूषण नियंत्रण मंडळ नवी मुंबई यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असून, या विमानतळाकरिता लागणारे गौण खनिज, दगड, शेजारील डोंगर पोखरून वहाळ ग्रामपंचायत हद्दीत असलेले दगड येथे आणले जाते. त्यानंतर वहाळ ग्रामपंचायत हद्दीतील स्टोन क्रेशरमधून त्याचे रूपांतर वेगवेगळ्या आकाराच्या खडीमध्ये केले जाते व त्याची वाहतूक मोठ मोठ्या ट्रकमधून केली जाते. हे सर्व करत असताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडील शासन निर्णयाची पूर्णतः पायमल्ली करत असल्याचे निदर्शनास येत आहे. मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असल्याने शासनाने वायू प्रदूषणासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, पनवेल तालुक्यातील स्टोन क्रशरचे मालक-चालक याला कचऱ्याची टोपली दाखवत असल्याचे दिसत आहे. तरी वायू प्रदूषणाविषयी शासनाने ठरवून दिलेल्या सूचनांचे पालन न करणाऱ्या सर्व क्रशरवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायत वहाळ यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

बहुतांश घरांवर धुळीकणांचा थर

वाढत्या प्रदूषणामुळे पनवेल तालुका चिंतेत आहे. पनवेल तालुक्यात जवळपास १०० क्रशर आहेत. कॉरी आणि क्रशर मुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत आहे. घराच्या खिडक्या उघड्या ठेवल्या तर धुळीच्या कणांचा थर घरामध्ये आढळून येत आहे. हे सर्व धोकादायक असून, त्याचा मानवी जीवनशैलीवर दूरगामी परिणाम होत आहे.

आजारांना निमंत्रण

या भागातील प्रत्येक कुटुंब खराब हवेच्या गुणवत्तेमुळे होणाऱ्या खोकला, सर्दी आणि श्वसन समस्यांना तोंड देत आहे. रात्री ही परिस्थिती आणखी बिकट होते. कारण, रस्त्यांवर धुळीच्या कणांचा जमाव झाल्यामुळे वाहन चालवणे धोकादायक होते. तसेच क्षयरोग फुफ्फुसाचा कर्करोग, दमा, कॅन्सर, बेशुद्ध होणे, घसा खवखवणे, डोळ्यातून पाणी येणे यासारखे विकार होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कॉरी आणि क्रशरवर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

बोडणी येथे नेत्रचिकित्सा शिबीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।
लायन्स क्लब अलिबागच्या माध्यमातून लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या सहकार्याने बोडणी येथील साईबाबा मंदिरात बुधवार, ६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ दरम्यान मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी लायन्स क्लब अलिबागचे प्रतिनिधी महेंद्र पाटील, लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे खजीनदार अरविंद घरत, लायन्स क्लब मांडवाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण कोळी, रमेश नाखवा, डॉ. शुभदा कुडतलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या मोफत शिबिरात लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या नेत्रतपासणी पथकाने ३० नेत्ररुग्णांची तपासणी केली. त्यापैकी १० जणांना मोतीबिंदू असल्याचे आढळले, त्यांच्यावर फाऊंडेशनच्या डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येऊन त्यांना मोतीबिंदूमुक्त करण्यात आले.

म्हसळ्यात लम्पीचा पुन्हा शिरकाव

शहरासह ग्रामीण भागातील अनेक गुरे बाधित; शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

। आंबेत । वार्ताहर ।
गेल्या वर्षी पशुपालकांना हादरवून सोडणाऱ्या लम्पी चर्मरोगाचा जिल्ह्यात पुन्हा शिरकाव झाला असून, म्हसळा तालुक्यात गावोगावी जनावरांना बाधा झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे पशुपालकांमध्ये पुन्हा संकट उभे राहिले आहे. दरम्यान, तालुक्यातील बहुतांश गुरांचे लसीकरण केले असून, बाधित जनावरे आढळल्यास शेतकऱ्यांनी घाबरुन न जाता तात्काळ पुशवैद्यकीय दवाखान्यात संपर्क करावा, असे आवाहन तालुका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यात गेल्यावर्षी लम्पी चर्मरोगाने थैमान घातले होते. त्यामध्ये अनेक जनावरे बाधित होऊन दगावली होती. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. दरम्यान, जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात ग्रामीण व शहरी भागात लम्पीची लागण झालेली गुरे फिरताना दिसत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, या आजारावर वेळीच आवर घालण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने गुरांचे लसीकरण मोहीम सुरु करण्याची गरज आहे अन्यथा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीस सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील जांभुळ, घुम, नेवरुल गावांत लम्पी आजाराने बाधित गुरे रस्त्यावर फिरताना निदर्शनास येत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. पशुवैद्यकीय विभागाने वेळीच सावध होऊन या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात गोधन संपत्ती आहे. जर लम्पी रोगाने फैलाव केला, तर मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याच्या शक्यतेने शेतकरी धास्तावले आहेत.

> म्हसळा तालुक्यात बहुतांश गुरांचे लसीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी घाबरुन जाऊ नये. जर लागण झालेली गुरे आढळली, तर त्वरित पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क करा.
> - डॉ काळे, पशुवैद्यकीय अधिकारी, म्हसळा

सुनील शिनगारे यांचे अकस्मात निधन

। नागोठणे । वार्ताहर ।
नागोठण्याजवळील बाळसई येथील मूळ रहिवासी असलेले व व्यवसायानिमित्ताने मुंबईतील मालाड परिसर स्थायिक झालेले शिवसेना पुष्पापार्क शाखा क्र. ३६ चे माजी गटप्रमुख व माजी उपशाखा प्रमुख सुनील गणपत शिनगारे (५३) यांचे नुकतेच अकस्मात निधन झाले. बाळसईतील सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिनगारे यांचे ते छोटे बंधू, तर आखाडा खेळाचे वस्ताद कै. गणपत शिनगारे यांचे ते छोटे सुपूत्र होत. त्यांच्या पश्चात पत्नी सुप्रिया, मुलगी रुषाली, मुलगा ऋषीकेश यांच्यासह मोठा परिवार आहे. दिवंगत सुनिल शिनगारे यांच्या पार्थिवावर बाळसई येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, आजी-माजी नगरसेवक, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. कै. सुनिल शिनगारे यांचे उत्तरकार्य बुधवार, दि. १३ डिसेंबर रोजी बाळसई येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे त्यांचे मोठे बंधू सुरेश शिनगारे यांनी सांगितले.

मच्छीविक्रेते रस्त्यावर; वाहतुकीला अडथळा

। आगरदांडा, प्रतिनिधी ।
मुरुड-जंजिरा नगरपरिषदेने लाखो रुपये खर्च करून मच्छीमार्केट बांधले आहे. परंतु, तरीसुद्धा काही मच्छीविक्रेत्या महिला बिनधास्तपणे रस्त्यावर मच्छी विक्री करत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे.

(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

मुरुड पर्यटन क्षेत्र असून, शहरातील मच्छीमार्केट जवळील मुख्य रस्त्यावरुन राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटक आपल्या वाहनातून ये-जा करीत असतात. मात्र, याच रस्त्यावरुन जाताना मच्छीविक्रेत्या महिलांचा सामाना करावा लागतो.

मच्छीविक्रेत्या आपली मच्छीची टोपली रस्त्यावरच ठाण मांडून विक्रीसाठी बसतात. वाहने आली तरी बाजूला होत नाहीत, त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. परिणामी, पर्यटकांना या वाहतुकीचा मनस्ताप सहन करावा लागतो. त्यात या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने पर्यटक दुहेरी संकटात सापडतो. तरी, या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी प्रशासनाने उपाययोजना करुन पर्यटकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

प्राथमिक शिक्षक समितीचे अधिवेशन

। तळा । वार्ताहर ।
महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा तळाचे त्रैवार्षिक अधिवेशन राजिप शाळा तळा येथे पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा नेते मारुती कळंबे हे होते. यावेळी निरीक्षक रमेश उभारे यांच्या निरीक्षतेखाली समितीची तळा तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

या कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी सुनील बैकर, कार्याध्यक्षपदी गौतम मनवर, खजिनदारपदी प्रवीण जाधव, सचिवपदी विनोद तुपे, महिला उपाध्यक्षपदी स्मृती शिंदे व सुहानी गावित यांची निवड करण्यात आली. यावेळी तळा तालुका शिक्षक समितीच्या वतीने तालुक्यातील आदर्श शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला. यामध्ये रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२२-२३ जाहीर झालेले जगदीश कासे (तळा), सविता बोराडे (कर्जत), नथुराम मुंढे (शाळा निगुडशेत), पर्णाली देशमुख (शाळा -तारणे), केंद्रस्तर आदर्श पुरस्कार तळा केंद्र अब्दुल रहीम दळवी (तळा उर्दू),टोकार्डे केंद्र रवींद्र फडके (मालाठे), पिटसई केंद्र अजित शिंदे (कडाक्याची गाणी), तळेगांव केंद्र चेतन जगताप (गायमुख), बोरघर केंद्र उमा भोई (बोरघर हवेली), महागाव केंद्र हराळे (महागाव), मजगाव केंद्र महेन्द्र देवरुस्कर (खोंडकोल आदिवासीवाडी) या गुणवंतांचा गौरव करण्यात आला.

शिक्षक समितीचे निष्ठावंत शिलेदार म्हणून किशोर तायडे, हनुमंत शेळके यांचाही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राज्य प्रतिनिधी अनिल नगोठकर, सुधीर सकपाळ, जिल्हा सचिव विजय येलवे, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश उभारे, जिल्हा उपाध्यक्ष यशवंत मोंढे, महिला आघाडी प्रमुख प्रज्ञा धोत्रे, जिल्हा कार्यालयीन चिटणीस भास्कर लेंडी, जिल्हा कोषाध्यक्ष अनिल खोपकर यांसह तळा तालुक्यातील शिक्षक समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिवेशनाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव विजय येळवे यांनी, तर सूत्रसंचालन सुनील बैकर यांनी केले.

वनराई बंधारे ठरताहेत वरदान

। पाताळगंगा । वार्ताहर ।
वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढून काही दिवस पाणी येथेच अडविले तर काही महिने या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. ग्रामीण भागातील शेतककऱ्यांकडून भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागत असतो. यामुळे गावपातळीवर बंधारा बांधून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे. यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणि पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरत आहेत.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात. मात्र, काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्त्व समजते. कारण, विहीर, तलाव, कूपनलिका, ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करीत असतात. पाणी हे आपले जीवन आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपले नैतिक कर्तव्य म्हणून पाणी अडविले पाहिजे.

पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशू, पक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असतो. यामुळे बंधाऱ्यांचे महत्त्व जाणून घेऊन पाणी अडविले पाहिजे. या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी होत आहे. शिवाय, शेतकरी या पाण्यावर भाजीपाल्यांचे उत्पन्न घेतात. त्यामुळे रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत आहे.

विकसित भारत संकल्प यात्रेस प्रारंभ

। म्हसळा । वार्ताहर ।
विकसित भारत संकल्प यात्रेला म्हसळा तालुक्यातील कांदळवाडा ग्रामपंचायतीतून सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकपनेतून राज्यात आणि केंद्रात शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या अनेक योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना या योजनांचा लाभ घेता यावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे तहसीलदार समीर घारे यांनी सांगितले.

शासनाच्या विविध योजनांपासून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांपर्यंत या योजनेचे स्वरूप, त्यापासून शेतकऱ्यांना होणारे फायदे याचा लाभ वंचित घटकानपर्यंत पोहोचावा या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशात विकसित भारत संकल्प यात्रा सुरु झाली. यावेळी मान्यवरांनी शासनाचे विविध उपक्रम आणि योजनांची सविस्तर माहिती ग्रामस्थ आणि वंचित लाभार्थ्यांना करून दिली.

याप्रसंगी तहसीलदार समीर घारे, गटविकासधिकारी बाळासाहेब भोगे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष समीर बनकर, माजी उपसभापती संदीप चाचले, अनिल बसवत, सरपंच पांडुरंग बने, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी डी. एन. दिघीकर, कक्ष अधिकारी हेमंत माळी, सर्व विभागांचे खातेप्रमुख, गाव अध्यक्ष, महिला मंडळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- ऑफिस कामाकरीता मुलगी पाहिजे. मो. ७४४७४८००००
- नागाव मधील हॉटेलमध्ये रिसेप्शनीस्ट, वेटर, हाऊसकिपर आणि ऑलराँऊडर कुक इत्यादी कामासाठी माणसे पाहिजेत. मो.९९२१९७८०८०/९२८४६३७६३४
- मशीन ऑपरेटर पाहिजे पात्रता III ठिकाण-बामणसुरे, चोंढी ८ तास ड्युटी, पगार-१०००० महिना Contact-7350055976
- घर कामासाठी बाई हवी आहे लहान बाळाला आंघोळ घालता येणे महत्त्वाचे आहे. कामाचे स्वरूप फोन करून समजून घेणे पगार -८०००+ ठिकाण-संभाजीवाडा अलिबाग फोन-८८८८२२०६७०/८५५१९६५१८९
- अलिबाग शहरात ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे. १२ वी पास, इंग्रजी, मराठी टायपिंग आवश्यक ७७७५८०२५०३
- किलबिल हॉस्पिटल अलिबाग फार्मासिस्ट पाहिजे. मो. ०९८५०५२७०५७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

किनारे पर्यटकांनी फुलले

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।
गुलाबी थंडीने मुरूड तालुक्यातील समुद्रकिनारे आणि निसर्ग न्हाऊन निघाला असून, रविवारी हा आनंद लुटण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक पर्यटक काशीद, मुरूड, नांदगाव समुद्रकिनारी दाखल झाल्याचे दिसून आले. सकाळपासून मुरुडचा प्रसिद्ध जंजिरा जलदुर्ग पर्यटकांच्या अभूतपूर्व हजेरीने फुलल्याचे दिसून आले. रविवारी सकाळपासून दुपारी २ वाजेपर्यंत पर्यटकांची सुमारे ५०० वाहने मुरूडमध्ये आल्याची माहिती मुरूड नगरपरिषद जकात नाका कर्मचारी मितेश माळी यांनी दिली.

मुरूडमध्ये शेकडो वाहने दाखल

दिवाळी सुट्टीनंतर पर्यटनाचा सिझन सुरू झाला असून, अनेक जण कुटुंबासमवेत काशीद, नांदगाव, मुरूड येथे मोठ्या संख्येने येत असलेले दिसत आहेत. काशीद किंवा मुरूड किनारी शनिवारी सकाळपर्यंत पर्यटकांची वर्दळ नव्हती. मात्र, सर्वत्र रेस्टॉरंट बुक होते, अशी माहिती मुरूडमधील हिरा रेसिडेन्सीचे मालक महेंद्र पाटील यांनी दिली, तर साई-गौरी रेस्ट हाऊसचे मालक हिराबाई बैले यांनीदेखील यास दुजोरा दिला.

काशीद येथील सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम यांनी सांगितले की, रविवारी पर्यटकांची संख्या तिपटीने वाढली, पार्किंगसाठी जागा अपुरी पडत होती. अनेक पर्यटकांनी नांदगाव समुद्रकिनारा आणि प्रसिद्ध सिद्धिविनायक देवस्थानला भेट देऊन दर्शनाचा लाभ घेतला. तिकडे मुरूड समुद्रकिनारी बंदर मार्ग जंजिरा किल्ल्याकडे जाणाऱ्या मार्गावरदेखील वाहनांची सातत्याने कोंडी होताना दिसत होती. रविवार असल्याने शाकाहारी, मांसाहारी जेवण आणि मासळीची लज्जत चाखण्यासाठी स्टॉल्स आणि हॉटेल्समधून प्रचंड गर्दी दिसत होती.

मुरूड समुद्रकिनाऱ्यावरून यांत्रिक बोटीने पद्मजलदुर्गात जाण्यासाठी पर्यटकांची वर्दळ होती. त्यामुळे जंजिरा तर पर्यटकांनी फुलून गेलेला दिसत होता. मुरूड दत्त देवस्थानलादेखील पर्यटक जाताना दिसून आले.

मुरूडमध्ये पार्किंगअभावी पर्यटकांनी मिळेल तेथे वाहने पार्क केलेली दिसत होते. जंजिरा जलदुर्गाजवळील राजपुरी जेट्टीवरदेखील पर्यटकांच्या वाहनांची पार्किंग वाळूवर करावी लागली. राजपुरी येथून शिडाच्या बोटीने जंजिऱ्यात जाण्याची एकमेव सुविधा आहे. त्याचप्रमाणे मुरूड समुद्रात पर्यटक पोहण्याचा आनंद लुटताना दिसत होते.

रोहा येथे विज्ञान प्रदर्शन उत्साहात

। खांब । वार्ताहर ।
इंग्रजी माध्यम शिक्षणासाठी नावलौकिक प्राप्त केलेल्या एम.बी. पाटील इंग्लिश मीडिअम स्कूल, वरसे-रोहा येथे शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी सरपंच मच्छिंद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते मंगेश कोकळे व मुख्याध्यापिका देसाई मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शीतल तुळवे, अश्विनी भगत, श्री. कुथे व शिल्पा मॅडम यांच्यासह स्कूलमधील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थी वर्गाच्या सुप्त कलागुणांना वाव मिळून त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात स्कूलमधून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन विविध वैज्ञानिक प्रतिकृतींचे उत्कृष्टपणे सादरीकरण केले. या प्रदर्शनात विजेत्यांना स्कूलच्या एका कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे मच्छिंद्र पाटील यांनी प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून स्कूलच्या या उपक्रमास मनापासून शुभेच्छा दिल्या.

विधानसभा, लोकसभेआधी रंगीत तालीम

तालुक्यात २३ ग्रामपंचायतींचा रंगणार रणसंग्राम

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील २३ ग्रामपमांचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका पुढील वर्षी २०२४ मध्ये होणार आहेत. बोरिवली ग्रामपंचायतचे विभाजन होऊन तयार झालेल्या दोन आणि मुदत संपणाऱ्या २१ ग्रामपंचायतींच्या मुदती एप्रिल २०२४ पर्यंत संपत असल्याने त्या २३ ग्रामपंचायत मध्ये नवीन वर्षात धुराळा उडण्याची शक्यता आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या आधी सर्व राजकीय पक्षांसाठी कसोटी पाहणारी निवडणूक म्हणून २३ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकडे पाहिले जात आहे.

तालुक्यात नुकत्याच सात ग्रामपंचायती याठिकाणी सार्वत्रिक निवडणूक झाली होती. त्यात शिवसेना शिंदे गटाने थेट सरपंचपदावर पाच ठिकाणी बाजू मारली. तर उपसरपंचपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने तीन आणि भाजपने दोन ठिकाणी आपले सरपंच विराजमान करण्यात यश मिळविले आहे. मात्र, आता नवीन वर्षात येऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये तब्बल २३ ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणुकांचा बार उडविला जाण्याची शक्यता आहे. तालुक्यातील फेब्रुवारी महिन्यात ११ ग्रामपंचायतींची, तर मार्च २०२४ मध्ये आठ ग्रामपंचायतींची आणि एप्रिल महिन्यात तालुक्यातील दोन ग्रामपंचायतींची मुदत संपत आहे.

बोरिवली ग्रामपंचायतीचे विभाजन झाल्याने नव्याने अस्तित्वात बोरिवली आणि अंजप या दोन ग्रामपंचायती यांच्या सार्वत्रिक निवडणुका नवीन वर्षात होण्याची शक्यता आहे. त्याचवेळी तालुक्यातील फेब्रुवारी २०२४ मध्ये आसल, माणगाव तर्फे वरेडी, पिंपळोली, शेलू, मानिवली, पाषाणे,वारे, कशेळे, बीड बुद्रुक, सावळे हेदवली आणि मोग्रज या ग्रामपंचायती यांच्या मुदती संपत आहेत. तर मार्च २०२४ मध्ये तालुक्यातील सावेळे, पळसदरी, हालिवली, ममदापुर, खांडपे आणि किरवली ग्रामपंचायत यांच्या मुदती संपत आहे. तर एप्रिल २०२४ मध्ये पाथरज आणि शिरसे ग्रामपंचायत यांची मुदत समाप्त आहेत. त्यामुळे या २३ ग्रामपंचायत मध्ये नवीन वर्षात राजकीय चुरस दाखवण्यासाठी मोठा रणसंग्राम पाहायला मिळणार आहे.

विष्णुदास भावे नाट्यगृहात

'नवरंगी नार'चा शुभारंभ

। पनवेल । प्रतिनिधी ।

लावणीक्वीन प्रियांका शेट्टी दिग्दर्शित बाबा शेट्टी प्रस्तुत श्री बालाजी व्यंकटेश्वर आर्ट निर्मित 'नवरंगी नार' कार्यक्रमाच्या शुभारंभाचा प्रयोग शुक्रवारी (दि.८ डिसेंबर) संध्याकाळी ४.३० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात मोठ्या दिमाखात पार पडला. तब्बल १७ वर्षांनंतर 'नवरंगी नार'चे जोरदार कमबॅक झाले असून रसिक प्रेक्षकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी सुप्रसिद्ध लावणी नृत्यांगना माया जाधव, दिग्दर्शक शहाजी काळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्रवणीय संगीत संयोजन, बहारदार नृत्य दिग्दर्शन, घरंदाज लावण्या, सुरेल वाद्यवृंद आणि लावण्यवतींचे लाजवाब सादरीकरण या पंचसूत्रीतून 'नवरंगी नार' ने रंगमंचावर उत्साहात पुनरागमन केले असून लावणीपासून दुरावलेला प्रेक्षकवर्ग नाट्यगृहात लावणी पाहण्यासाठी

१७ वर्षांनंतर जोरदार पुनरागमन

कुटुंबासह आवर्जून गर्दी करेल असा विश्वास यावेळी कलाप्रेमींनी व्यक्त केला. कार्यक्रमाची संकल्पना व संगीत संयोजन अमीर हडकर तर नृत्य दिग्दर्शन राजेश गमरे यांनी केले असून, कलाप्रेमींनी टाळ्यांच्या कडकडाटात 'नवरंगी नार'चे जोरदार स्वागत केले. प्रस्तुत कार्यक्रमातील नृत्यांगनांनी दिलखेचक अदाकारींनी एकापेक्षा एक कलाकृती सादर करुन उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

लावणीक्वीन प्रियांका शेट्टी यांच्यासह नृत्य दिग्दर्शक राजेश गमरे, नृत्यांगना देवयानी चंदगडकर, पल्लवी थोरवे, ढोलकीच्या तालावर फेम समता आमणे, माया शिंदे, सिद्धी मेस्त्री, तेजस्विनी महाडिक तसेच सहनृत्यांगनांनी गण, गवळण, मुजरा, स्व. सिनेतारका संध्या यांच्यावर चित्रित झालेल्या अजरामर लावण्या, छक्कड, गोंधळ, बैठकीच्या लावण्या, पारंपारिक लावण्यांपासून ते आयटम साँग्स व आताच्या घडीच्या चित्रपटांतील लोकप्रिय लावण्या सादर करून अनेकोत्तम गीतनृत्यांनी बहरलेल्या कार्यक्रमाची सांगता आई जगदंबेचा जागर करुन करण्यात आली.

'नवरंगी नार'चा पुढील प्रयोग सोमवारी (दि.११ डिसेंबर) शिवाजी मंदिर दादर येथे दुपारी ४ वाजता संपन्न होणार आहे. या प्रयोगाला देखील लोककलेची राणी अर्थात लावणीवर प्रेम करणाऱ्या तमाम रसिक प्रेक्षकांनी कुटुंबियांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभाशीर्वाद द्यावेत, असे आवाहन 'नवरंगी नार'च्या समस्त टीमकडून करण्यात आले आहे.

त्याकाळी महाराष्ट्र, भारतभर आणि परदेशातही गाजलेल्या 'नवरंगी नार'ला १७ वर्षानंतरही मायबाप रसिकांचे भरभरून प्रेम लाभले असून ही तर खऱ्या अर्थाने सुरुवात आहे. यापुढेही पुन्हा एकदा सर्वत्र रसिकांच्या उदंड प्रतिसादात 'नवरंगी नार' ची घोडदौड सुरू राहणार असल्याचा विश्वास लावणीक्वीन प्रियांका शेट्टी, संगीत संयोजक अमिर हडकर, नृत्य दिग्दर्शक राजेश गमरे यांच्यासह 'नवरंगी नार'च्या संपूर्ण टीमकडून व्यक्त करण्यात येत आहे.

सरकारी कर्मचारी १४ डिसेंबरपासून बेमुदत संपावर

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

मार्च २०२३ मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप आंदोलन छेडले होते. परंतु, अद्याप शासनाकडून या मागण्यांसंदर्भात अंतिम ठोस निर्णय न झाल्यामुळे राज्य सरकारी कर्मचारी, निम सरकारी कर्मचारी,जि.प. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, न.प. कर्मचारी १४ डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे सदर संघटनेचे श्रीवर्धन तालुका अध्यक्ष रविदास जाधव यांनी सांगितले. तशा आशयाचे मुख्यमंत्री यांच्याकडे पाठविण्याचे निवेदन श्रीवर्धनचे तहसिलदार महेंद्र वाकलेकर यांच्यामार्फत देण्यात आले आहे.

नवीन पेन्शन योजना रद्द करुन सर्वांना जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, सर्व रिक्त पदे तात्काळ भरणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या विनाशर्त करणे, चतुर्थ श्रेणी व वाहन चालक पदे भरण्यावरील बंदी हटवा, नवीन शिक्षण धोरण रद्द करणे, शासकीय विभागात कोणत्याही स्वरुपाच्या खासगीकरण/कंत्राटीकरणास मज्जाव करण्यात यावा, या व इतर मागण्यांची पूर्तता न झाल्यास १४ डिसेंबरपासून सदर बेमुदत संप करण्यात येईल, असे निवेदनात म्हटले आहे.

एलइडी मासेमारी पूर्णतः बंद करा

मनोहर मकु यांची मागणी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य विभागाकडून एल.इ.डी मासेमारी करणाऱ्यांवर बंदी असली तरी खोल समुद्रात मोठ्या प्रमाणत एल.इ.डी मासेमारी सुरु आहे. त्यामुळे छोटे छोटे मच्छिमार, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणारे दालदी मच्छिमार हैराण झाले असून, खोल ते समुद्रात जाऊनसुद्धा त्यांना आपल्या मेहनतीप्रमाणे पुरेशी मासळी मिळत नसल्याने कर्जबाजारी झाले आहेत. याची राज्य शासनाने घेऊन खोल समुद्रात एल.इ.डी पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी, अशी मागणी सागर कन्या मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष व महादेव कोळी समाजाचे माजी खजिनदार मनोहर मकु यांनी केली आहे.

मच्छिमारांच्या समस्या राज्य शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी नुकतीच पत्रकार यांची भेट घेऊन मकु यांनी आपली व्यथा मांडली आहे. एल.इ.डी मासेमारी पूर्णतः बंद होण्यासाठी मत्स्य विभागाने अधिक सजग होणे खूप आवश्यक आहे. यासाठी

मनुष्यबळसुद्धा वाढवणे गरजेचे आहे. तसेच खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी गस्ती नौकासुद्धा आवश्यक आहेत. तरच एल.इ.डीचा वापर करणाऱ्यांवर कार्यवाही करणे सहज सोपे जाणार आहे. यासाठी राज्य शासनाने मत्स्य विभागाला अधिक ताकद प्रदान करावी, अशी मागणीसुद्धा मनोहर मकु यांनी केली आहे.

खोल समुद्रात जाऊनसुद्धा मासळी मिळत नसल्याने मच्छिमारांसाठी दुष्काळ जाहीर करून समस्त कोळी समाजास मदतीचा हात द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी मकु यांनी सांगितले की, नोव्हेंबर २०२३ पर्यंतचे मागील एक वर्षाचा डिझेल परतावा याची रक्कम लवकरात लवकर बोट मालकांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावा, तरच मच्छिमारांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळणार आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री १) पराग मनसुखलाल मेहता, २) मनसुखलाल मोहनलाल मेहता यांचेकडून कायमची विकत घेण्याची ठरविली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकत परिशिष्ट

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर. प्रती.	आकार
४७	५	२३.३०	०.२७
४७	६	२४.३०	०.४२

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाणखत, वारसाहक्क, इजमेंट हक्क अथवा कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विकसन कराराचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उमरोली कर्जत रायगड
दिनांक : ०९/१२/२०२३

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०९, ममदापूर रोड,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७

जगनाडे महाराजांची जयंती उत्साहात

। लांजा । प्रतिनिधी ।

लांजा तालुका तेली समाज बांधवांच्या वतीने महाराष्ट्राचे थोर संत आणि तेली समाजाचे संत शिरोमणी आराध्य दैवत संताजी जगनाडे महाराज यांची ३९९ वी जयंती शहरातील देव चव्हाटा मंदिर लांजा येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन लांजा गावचे गावकर विठोबा लांजेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी लांजा तालुका तेली समाजाचे अध्यक्ष प्रकाश लांजेकर, राजेश लांजेकर, गुरु प्रसाद तेली, साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर लांजा तालुका तेली समाजाचे अध्यक्ष प्रकाश लांजेकर यांनी तेली समाजाचे महान संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवन चरित्राविषयी थोडक्यातमाहितीसांगितली.याकार्यक्रमास उमेश लांजेकर, संजय लांजेकर, चंद्रकांत रहाटे, मंगेश लांजेकर, रामदास लांजेकर, अनिल लांजेकर, रामचंद्र लांजेकर, अक्षय लांजेकर, महेश लांजेकर, भरत लांजेकर, तुषार लांजेकर, किरण पालकर मोठ्या संख्येने तेली समाज बांधव उपस्थित होते.

हापूसला हंगाम लांबणार

रत्नागिरी : चैत्र महिन्याची सुरूवात होताच सर्वांना गुढीपाडव्याचे आणि त्यापाठोपाठ आंब्याचे वेध लागतात. आंब्याचे नाव घेतले की डोळ्यासमोर पहिले नाव येतं ते कोकणचा राजा हापूस याचं. यंदा मात्र आंबाप्रेमींसाठी चिंतेची बातमी आहे. कारण यंदा फळांचा राजा, हापूस खाण्यासाठी खवय्यांना वाट पाहावी लागणार आहे. यंदा हापूस आंब्याचा हंगाम लांबण्याची शक्यता आहे. सध्या १५ टक्केच हापूसच्या कलमांना मोहोर आल्याने फळ हातात येण्यासाठी बराच काळ वाट पहावी लागू शकते. कमी कलमांना आलेला मोहोर, तसेच ढगाळ हवामान आणि अवकाळी पाऊस या तिन्ही गोष्टींचा फटका आंब्याच्या पिकाला बसू शकतो. तसेच मोहोर प्रक्रिया लांबल्याने यंदा हापूसचा हंगाम लांबण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दुकानांवर मराठी पाट्या लावाव्यात

न्यायालयाच्या निर्णयाकडे दुर्लक्ष

। चिपळूण । प्रतिनिधी ।

मराठी पाट्यांविरोधात उच्च न्यायालयात गेलेल्या मुंबईतील व्यापाऱ्यांना फटकारत उच्च न्यायालयाने दोन महिन्यांत सर्व दुकानांवर मराठी पाट्या लावण्याचा आदेश दिला. त्यामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मागणीला यश आले असून, उच्च न्यायालयाने दिलेली मुदत संपली तरीही चिपळुणातील दुकानांवर मराठी पाट्या लावण्यात आल्या नाहीत. त्यामुळे मनसे पदाधिकाऱ्यांनी नियमानुसार मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकान मालकांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दुकानांवर आठ दिवसांत मराठी पाट्या लावण्याची मागणी करीत याकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखविणाऱ्या दुकान मालकांवर कारवाई करावी, अन्यथा मनसे

मनसेची आठ दिवसांची मुदत

स्टाईलने कारवाई करु व त्याला प्रशासन जबाबदार असेल, असे मनसे पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

जिल्हा सचिव संतोष नलावडे यांच्या नेतृत्वात मनसे पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार प्रवीण लोकरे यांच्याकडे या मागणीचे निवेदन सुपूर्द केले. दुकान मालकांनी आपल्या दुकानांवर आठ दिवसात मराठी पाट्या न लावल्यास, मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. मनसेचे जिल्हा सचिव संतोष नलावडे, तालुकाध्यक्ष विश्वनाथ डोळस, तालुका सचिव संदेश साळवी, उप तालुकाध्यक्ष हमीद सय्यद, सुरेश घाग, संतोष हातिसकर, विभाग अध्यक्ष योगेश चव्हाण, उपविभाग अध्यक्ष मंगश राडे, नारदखेरकी शाखा अध्यक्ष संदीप आंबवकर आदी पदाधिकाऱ्यांनी या मागणीचे निवेदन चिपळूणचे तहसीलदार प्रवीण लोकरे यांच्याकडे सुपूर्द केले आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक भास्कर रघुनाथ लोंगले यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रू.पै.
९७	६	०-०८-००	०-०६

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लिन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/१२/२०२३

ॲड. सी.बी. ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेंट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड- ४१०२०१

समाजहितास बांधवांकडून प्राधान्य : टिंगरे

। आंबेत । वार्ताहर ।

कुणबी समाज बांधवांकडून समाजाच्या हितास प्राधान्य देण्याचे काम करण्यात येत असल्याचे मत महेंद्र टिंगरे यांनी व्यक्त केले. म्हसळा तेथील सत्कार समारंभ आणि दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले.

म्हसळा तालुका कुणबी समाज समाजाची जनजागृती करून सर्वच क्षेत्रात उन्नती व्हावी, गावाची एकता अखंडित राहील, कुटुंबात, भावकीत, गावकीत राजकारणाने पडलेली फूट, भावा-बहिणीची तुटलेली नाती या सर्व गोष्टींवर दृष्टीक्षेप टाकत बिनविरोध नाटकाच्या माध्यमातून करमणूक करीत कुटुंबाची एकता कशी ठेवावी गावाची अखंडता अबाधित ठेवण्यासाठी ह्या नाटकाची निर्मिती करुन समाजहिताचा वसा तेवत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य समाजाने केले आहे. यावेळी गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ समाजाची सेवा करणारे समाजरत्न म्हणून ३३ नेत्यांचा कुणबी समाज मुंबई यांच्या नेतृत्वाखाली सन्मान सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र टिंगरे यांनी समाज बांधवांना संदेश देताना एक आठवण करुन देत समाजहिताच्या दृष्टीने समाजाला केव्हाही साथ घाला तन-मन-धन अर्पण करीत पुढे धावत असतात, हीच समाजाची खरी संपत्ती आहे, समाजहिताचा विचार करून प्रत्येक समाज बांधव प्रत्येक्षक क्षेत्रात कार्यरत आहे, असं त्यांनी यावेळी म्हटलं.

याप्रसंगी तालुकाध्यक्ष महादेव पाटील, महेंद्र टिंगरे, राजू धाडवे, सहसचिव अनिल काप, कल्पेश जाधव, खजिनदार सदानंद आग्रे, स्थानिक उपाध्यक्ष लहुजी तुरे, सल्लागार भाये, सहसचिव राजाराम तिलटकर, कुणबी व्यापारी वाहतूक संघ अध्यक्ष महेश पवार, मंडळ अध्यक्षा स्नेहा खापरे, मीना टिंगरे, युवक अध्यक्ष रुपेश भोगल, सचिव उमेश पोटले, खजिनदार विजय काप आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

हिरवळ महाविद्यालयात सायबर सुरक्षा अभियान

। माणगाव । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड व हिरवळ रात्र महाविद्यालय, महाड महाविद्यालयातील आय.टी., कॉम्प्युटर सायन्स विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (डीएलएलइ) मार्फत रायगड पोलीस सायबर क्राईम विभाग व (एमकेसीएल) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. ९ डिसेंबर रोजी सायबर सुरक्षा अभियान आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मंगेश जाधव (एमकेसीएल, कोकण विभाग समन्वयक), सिद्धेश गोसावी (एमकेसीएल, रायगड जिल्हा समन्वयक), विश्वास मते (एमकेसीएल), रायगड जिल्हा कन्सल्टंट), अद्वैत जाधव (एमकेसीएल, रायगड जिल्हा कन्सल्टंट), मनीष कदम (एमकेसीएल समन्वयक), अंजली मोरे (एमकेसीएल समन्वयक), हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, हिरवळ रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य राकेश वडवळकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील आयक्यूएसी विभाग प्रमुख प्रोफेसर ज्योती पुजारी यांनी केले. सिद्धेश गोसावी यांनी सोशल मिडियाचा वाढता वापर व त्यातील संभाव्य धोके यावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. सायबर गुन्ह्यांपासून स्वतः ला सुरक्षित ठेवण्यासाठीचे विविध मार्ग त्यांनी पीपीटीच्या माध्यमातून विविध उदाहरणे देऊन सांगितले. मोबाईल त्याचा पासवर्ड, मेल आयडी त्याचा पासवर्ड वेळोवेळी बदलला पाहिजे, तसेच व्हीपीएन सारख्या नेटवर्कचा वापर करून फ्री वायफाय वापर, सोशल मीडिया व त्यापासून होणारी फसवणूक यावर त्यांनी प्रकाशझोत टाकला. तसेच काड्र्स स्कॅम, फिजिंग स्कॅम, स्किमिंग स्कॅम, क्लोनिंग यातून सायबर क्राईम कसे होतात व त्यापासून कसे संरक्षण करावे याचेही मार्गदर्शन केले. व्हायरस, यूपीआय फसवणूक, सायबर स्टकिंग, डीप फेक यावरही त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. जर आपल्याला वरीलपैकी कोणत्याही प्रकारे फसवले गेले असेल तर हेल्पलाईन नंबर १९३०, तसेच मेल हॅक झाला असल्यास havebeenpwned.com व scatterrdsecrets.com वर तक्रार करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमाबाबत कौतुक करून नियमितपणे महाविद्यालयात अशा विविध जनजागृतीपर उपक्रमांचे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करावे, असे मत व्यक्त केले.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

महिला खेळाडू मालामाल

काशवी गौतम सर्वात महागडी खेळाडू

३० खेळाडूंची विक्री, ५ खेळाडूंना कोट्यवधी बोली

। मुंबई । प्रतिनिधी ।

महिला प्रीमियर लीगच्या दुसऱ्या हंगामासाठीचा लिलाव शनिवारी झाला. यावेळी फ्रँचायझीने ३० खेळाडूंची खरेदी केली, ज्यात ९ विदेशी आणि २१ भारतीय खेळाडूंचा समावेश होता. सुमारे साडेतीन तास चाललेल्या या लिलाव प्रक्रियेत फ्रँचायझीने ३० खेळाडूंवर १२.७५ कोटी रुपये खर्च केले. या लिलावात ९० खेळाडूंची नावे मागवण्यात आली होती.

भारताच्या काशवी गौतम आणि वृंदा दिनेश यांच्या लिलावाने सर्वांनाच चकित केले. काशवी गौतमला २ कोटी आणि वृंदा १.३० कोटींना विकले गेले. दोघांची मूळ किंमत प्रत्येकी १० लाख रुपये होती. ऑस्ट्रेलियाच्या नाबेल सदरलँडलाही दिल्ली कॅपिटल्सने २ कोटी रुपयांना विकत घेतले, ती सर्वात महागडी परदेशी खेळाडू आहे. डिआंड्रा डॉटिन, चामरी अटापट्टू देविका वैद्य, एमी जॉन्स आणि किम गर्थ अनसोल्ड राहिले आहेत.

लिलावात ५ खेळाडूंची किंमत एक कोटींहून अधिक होती. काशवीच्या आधी, अनकॅप्ड वृंदा दिनेश सध्याच्या लिलावातील पहिली भारतीय करोडपती खेळाडू ठरली. तिला यूपी वॉरियर्सने १.३० कोटी रुपयांना खरेदी केले, जी मूळ किमतीपेक्षा १३ पट अधिक आहे. वृंदाची मूळ किंमत १० लाख रुपये होती. सदरलँड, वृंदा आणि काशवी यांच्याशिवाय ऑस्ट्रेलियाच्या फोबी लिचफिल्ड (१ कोटी) आणि दक्षिण आफ्रिकेच्या शबनीम इस्माईल (१.२० कोटी) यांनाही लिलावात एक कोटींहून अधिक रुपये मिळाले. लिचफिल्डला गुजरातने, तर शबनिमला मुंबईने विकत घेतले.

काशवी गौतम पहिल्यांदाच खेळणार

२० वर्षांची काशवी गौतम या लिलावात सर्वात महागडी खेळाडू ठरली. वेगवान गोलंदाजी अष्टपैलू काशवी चंदीगडमधून देशांतर्गत क्रिकेट खेळतो. २०२० मध्ये अरुणाचल प्रदेश विरुद्ध घरच्या एकदिवसीय सामन्यात १० बळी घेत ती प्रसिद्धीच्या झोतात आली. त्यानंतर तिला २०२२ मध्ये अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाकडून खेळण्याची संधी मिळाली.

वृंदा दिनेश पहिली अनकॅप्ड करोडपती

सेट-६ मध्ये अनकॅप्ड फलंदाजांची नावे आली. यापैकी २२ वर्षीय वृंदा दिनेश या लिलावाची पहिली भारतीय करोडपती खेळाडू ठरली आहे. यूपी वॉरियर्सने त्याला १ कोटी ३० लाख रुपयांना खरेदी केले. त्याची मूळ किंमत फक्त १० लाख रुपये होती, म्हणजेच यूपीने त्याला त्याच्या मूळ किमतीपेक्षा १३ पट जास्त देऊन आपल्या संघात समाविष्ट केले.

१० सेटमध्ये १७ खेळाडू विकले, १३ जागा खाली

लिलाव सुरू होण्यापूर्वी ५ संघांमध्ये ३० खेळाडू शिल्लक होते. १० सेटपर्यंत १७ खेळाडूंची विक्री झाली असून, त्यापैकी ६ विदेशी आणि ११ भारतीय आहेत. आता आणखी १३ खेळाडू खरेदी केले जातील, त्यापैकी केवळ ३ परदेशी असू शकतात. याचा अर्थ, आता १० भारतीय खेळाडूंसाठी मोठी बोली लावली जाऊ शकते.

डॉटिन आणि अटापट्टू अनसोल्ड

५० लाखांची मूळ किंमत असलेल्या दोन्ही खेळाडू विकल्या गेल्या नाहीत, त्यापैकी वेस्ट इंडिजची डिएंडर डॉटिन आणि ऑस्ट्रेलियाची किम गर्थ यांना खरेदीदार मिळाला नाही. याशिवाय इंग्लंडची एमी जॉन्स आणि श्रीलंकेची चमारी अटापट्टू यादेखील अनसोल्ड राहिल्या आहेत. जॉनची मूळ किंमत ४० लाख रुपये आणि अटापट्टूची ३० लाख रुपये होती.

या खेळाडूंचा लिलाव

परदेशी- नाबेल सदरलँड (दिल्ली), शबनिम इस्माईल (मुंबई), फोबी लिचफिल्ड (गुजरात), कॅट क्रॉस (बंगळुरू), जॉर्जिया वेअरहम (बंगळुरू) आणि डॅनी व्याट (यूपी). भारतीय- काशवी गौतम (गुजरात), वृंदा दिनेश (यूपी), एकता बिश्त (बंगळुरू), मेघना सिंग (गुजरात), त्रिशा पूजिता (गुजरात), अपर्णा मंडल (दिल्ली), सायमा ठाकूर (यूपी), अमनदीप कौर (मुंबई), एस सजना (मुंबई), पूनम खेमनार (यूपी) आणि प्रिया मिश्रा (गुजरात).

कबड्डी स्पर्धेत आपटवणे विजयी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

रणधुरंधर स्पोर्ट्स क्लब पाली यांच्यावतीने तालुकास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार, दि. ९ रोजी क्रीडा संकुल, पाली येथे करण्यात आले होते. या स्पर्धेतील अंतिम लढत आपटवणे विरुद्ध रासळ एन या संघात झाली. अटीतटीच्या लढतीत आपटवणे संघाने विजेतेपदावर नाव कोरले.

या स्पर्धेत तालुक्यातील ३२ नामवंत संघांनी प्रवेश नोंदविला होता. या स्पर्धेसाठी सुधागडातील कबड्डीप्रेमींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या स्पर्धेतील अंतिम लढत आपटवणे विरुद्ध रासळ एन या संघात झाली. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी बहारदार खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेचा अंतिम विजयी कालभैरव आपटवणे हा संघ ठरला. या संघास रोख रक्कम ११ हजार १११ रु. व आकर्षक चषक, तर उपविजेता जय हनुमान रासळ एन या संघास रोख रक्कम ७ हजार ७७७ रु. व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचा मानकरी नाथभैरव झाप, तर चतुर्थ क्रमांकावर भैरवनाथ वावे या संघाला समाधान मानावे लागले. या दोन्ही संघांना प्रत्येकी ५ हजार ५५५ व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू समाधान मोरे, उत्कृष्ट चढाई अथर्व खाडे, तर उत्कृष्ट पक्कड जयेश खाडे, पब्लिक हिरो रोशन ठाकूर या सर्व खेळाडूंना आकर्षक चषक देऊन मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

आजपासून रंगणार कबड्डीचा थरार

यंग भारत मंडळातर्फे कुमारांची जिल्हास्तरीय स्पर्धा

। मुंबई । प्रतिनिधी ।

यंग भारत सेवा मंडळाच्यावतीने दि.११ ते १४ डिसेंबर या कालावधीत कुमार गट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रभादेवी येथील राजाभाऊ साळवी मनोरंजन मैदानात होणाऱ्या या स्पर्धेत मुंबईतील १६ नामवंत संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेत अंतिम विजयी होणाऱ्या संघास स्व. सतीशचंद्र चषक व रोख रू. सात हजार (७,०००/-), तर उपविजयी संघास स्व. वंदना रघुनाथ नाईक चषक व रोख रू. पाच हजार (५,०००/-) प्रदान करण्यात येतील.

स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडूस रोख रू. दोन हजार व मिक्सर देण्यात येईल. स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई आणि पकडीच्या खेळाडूस प्रत्येकी रोख रू. हजार व मिक्सर प्रदान करण्यात येईल. संस्कृती प्रतिष्ठान विरुद्ध विकास मंडळ यांच्यातील लढतीने या स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेचे उद्घाटन सोमवार, दि. ११ डिसेंबर रोजी सायं. ७ वा. सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे विश्वस्त सुनील गिरी यांच्या हस्ते होणार आहे. स्थानिक नगरसेवक समाधान सरवणकर, सामाजिक कार्यकर्ते उमेश गावडे, गोल्डी बाळा आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मंडळाचे सचिव मिलिंद भारती यांनी दिली आहे.

मैदानाची दुरवस्था

● नवीन पनवेलमधील सेक्टर १४ गार्डनमधील बाकं तुटली आहेत. दुसरीकडे धोकादायक ठरणारी झाडं कापलेली असून, तशीच पडून आहेत. तुटलेली खेळणी, व्यायाम करण्याकरिता असलेली साधनं तुटलेल्या अवस्थेत आहेत. याकडे प्रशासन कधी लक्ष देणार, असा प्रश्न शालेय विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिकांकडून विचारला जात आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

हार्दिक, शमी संघात परतण्याचा मुहूर्त ठरला

जय शाह यांनी दिली महत्त्वाची माहिती

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या आणि वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी हे संघाचे प्रमुख खेळाडू दुखापतीच्या समस्येने त्रस्त आहेत. दरम्यान, विश्वचषक स्पर्धेत हार्दिकला दुखापत झाली होती, तर शमीला घोट्याच्या दुखापतीचा त्रास होत आहे. त्यामुळे दोघेही संघाबाहेर आहेत. त्यांचा संघात परतण्याचा मुहूर्त ठरला असून, याबाबत बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी माहिती दिली.

भारतीय क्रिकेट संघ सध्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. या मालिकेसाठी हार्दिक पांड्याचा समावेश केलेला नाही, मात्र मोहम्मद शमीला दुखापत बरी झाल्यास

खेळण्याची संधी दिली जाऊ शकते, असे जय शहा यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, हार्दिक पांड्या बरा होत असून, तो अफगाणिस्तान मालिकेत संघात खेळू शकतो. जानेवारीमध्ये भारतीय अफगाणिस्तानविरुद्ध ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. ही मालिका ११, १४ आणि १७ जानेवारीला खेळवली जाणार आहे. त्या मालिकेत हार्दिक पांड्याचे पुनरागमन होऊ शकते, असे ते म्हणाले आहेत. तर जय शाह यांनी मोहम्मद शमीच्या दुखापतीबद्दल माहिती देताना सांगितले की, दक्षिण आफ्रिका मालिकेदरम्यान शमी तंदुरुस्त होऊ शकतो. त्यामुळे पांड्या आणि शमी लवकरच भारतीय संघात परतण्याची शक्यता आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पुणे अर्ध मॅरेथॉन स्पर्धा

उत्तम पाटीलने मारली बाजी

। पुणे । प्रतिनिधी ।

बजाज अलियान्झ पुणे अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत २१.१ किलोमीटर प्रकारात उत्तम पाटीलने प्रथम क्रमांक पटकावला. त्याने २१.१ किलोमीटरचे अंतर १ तास ५ मिनिटे अन् ४ सेकंदात पूर्ण केले. सुशांत जेधेने दुसऱ्या क्रमांकावर शर्यत पूर्ण केली. सुशांत जेधे आणि उत्तम पाटीलमध्ये फक्त १७ सेकंदाचे अंतर राहिले. सुशांतने १ तास ५ मिनिटे २१ सेंकद वेळ नोंदवली.

महिलांमध्ये २१.१ किलोमीटरची मॅरेथॉन रेशमा केवटेने जिंकली. तिने १ तास १३ मिनिटे अन् १८ सेकंद अशी वेळ नोंदवली. १० किलोमीटर अर्ध मॅरेथॉनमध्ये महिला विभागात साक्षी जडियालने ३६ मिनिटे ५२ सेकंद वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला. तर पुरूष विभागात असिफ खानने ३० मिनिटे २५ सेकंद

वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत धावणारे फक्त पुणेकरच उपस्थित नव्हते, तर आपल्या मराठमोळ्या संस्कृतीचं दर्शन घडवणारे मावळे देखील सर्वांच लक्ष वेधून घेत होते. हडपसर येथील भुराराम चौधरी यांनी मॅरेथॉनमध्ये सहभागी होत पारंपरिक वेशभूषा करत संकृती जपण्याचा संदेश दिला.

ग्लेन फिलिप्सची यशस्वी झुंज

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बांगलादेश आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात ग्लेन फिलिप्सने बांगलादेशचा तोंडचा घास पळवला. ढाका येथील दुसऱ्या कसोटीत फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर चौथ्या डावात किवींना विजयासाठी १३७ धावांची गरज होती. मात्र, न्यूझीलंडची अवस्था ६ बाद ६९ धावा अशी झाली होती. मात्र, ग्लेन फिलिप्सने नाबाद ४० धावा करत विजय खेचून आणला. त्याला मिचेल सँटनरने ३५ धावा करत चांगली साथ दिली.

तत्पूर्वी, बांगलादेशने प्रथम फलंदाजी करत पहिल्या डावात सर्वबाद १७२ धावा केल्या होत्या. मुशफिकूर रहीमनं सर्वाधिक ३५, तर शहादत हुसैनने ३१ धावा करत चांगली साथ दिली. तर न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने ३, मिचेल सँटनरने ३ गडी बाद केले. एजाझ पटेलने २ बळी घेत त्यांना चांगली साथ दिली. यानंतर बांगलादेशने दुसऱ्या डावात १८० धावा करत चोख प्रत्युत्तर दिले. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने सर्वाधिक ८७ धावा केल्या. पहिल्या डावात किवींनी ८ धावांची आघाडी घेतली.न्यूझीलंडसमोर विजयासाठी १३७ धावांचे आव्हान होते. हे आव्हान पार करताना न्यूझीलंडचा निम्मा संघ ५० धावात गार झाला होता. मात्र, सातव्या गड्यासाठी ग्लेन फिलिप्स (४० धावा) आणि मिचेल सँटनर (३५ धावा) यांनी ६८ धावांची नाबाद विजयी भागीदारी रचली.

बीसीसीआयचे सचिव जय शहा यांचे वक्तव्य

रोहितच्या निर्णयावर आताच चर्चा नको

। मुंबई । प्रतिनिधी ।

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा पुढील वर्षी जूनमध्ये सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी आयपीएलचे आयोजन केले जाणार आहे. तसेच जानेवारी महिन्यात भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध ट्वेन्टी-२० मालिकाही खेळणार आहे. त्यामुळे रोहित शर्मा पुन्हा टी-२० खेळणार की नाही, या निर्णयाची घाई करण्याची अजिबातच आवश्यकता नसल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शहा म्हणाले. महिला प्रीमियर लीगसाठी (डब्ल्यूपीएल) मुंबईत पार पडलेल्या लिलावासाठी ते उपस्थित होते.

रोहितला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० व एकदिवसीय संघात स्थान न मिळाल्याने त्याच्या भविष्याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यातच हार्दिक पंड्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत तंदुरुस्त होण्यासाठी मेहनत घेत आहे. त्यामुळे संघाच्या नेतृत्वाबाबतही चर्चा होत आहे. हार्दिकबाबत विचारले असता शहा म्हणाले, ''आम्ही हार्दिकच्या सुधारणेवर लक्ष ठेवून आहोत. तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) आहे आणि संघात पुनरागमन करण्यासाठी मेहनत घेत आहे.

राहुल द्रविड आणि अन्य सहाय्यक प्रशिक्षकांचा कार्यकाळ वाढवला असला तरीही, त्यांच्या कालावधीबाबत स्पष्टता नाही. त्याबद्दल शहा यांनी सांगितले, 'आम्ही सर्वांचा कार्यकाळ वाढवला आहे. मात्र, कराराचा कालावधी किती असेल हे अद्याप ठरवलेले नाही. विश्वचषक स्पर्धेमुळे आम्हाला यासाठी वेळ मिळाला नाही. संघ दक्षिण आफ्रिकेवरुन परतल्यानंतर आम्ही याबाबत निर्णय घेऊ.'

भारतीय महिलांनी मालिका गमावली

इंग्लंडकडून माफक आव्हानाचा सहज पाठलाग

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतीय महिला क्रिकेट संघ आणि इंग्लंड महिला क्रिकेट संघ यांच्यातील दुसऱ्या टी २० सामन्यात इंग्लंडने भारताचा ४ गडी राखून पराभव केला. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताला ८० धावांत रोखले. त्यानंतर हे आव्हान ६ फलंदाजांच्या मोबदल्यात १२ व्या षटकातच पार केले. इंग्लंडने तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पहिले दोन सामने जिंकून मालिका २-० अशी खिशात घातली आहे.

मुंबईच्या वानेखेडे स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या टी २० सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा हा निर्णय इंग्लंडच्या गोलंदाजांनी सार्थ ठरवत भारताची अवस्था ५ बाद ३४ धावा अशी केली होती. भारताकडून स्मृती मानधना

आणि जेमिमाह रॉड्रिग्ज या दोन बॅटरच दुहेरी आकडा गाठू शकल्या.

स्मृतीने १०, तर जेमिमाहने ३० धावांचे योगदान दिले. भारताच्या इतर कोणत्याही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. भारताचा संपूर्ण डाव ८० धावात संपुष्टात आला. इंग्लंडकडून चार्लेट डीन, लॉरेल बेन, एकलस्टोन सारा ग्लेन यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. भारताचे ८० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लंडने आक्रमक सुरूवात करण्याचा प्रयत्न केला. मात्र, रेणुका सिंह ठाकूरच्या भेदक माऱ्यामुळे इंग्लंडच्या पहिल्या तीन षटकातच दोन गडी बाद झाले होते. मात्र, त्यानंतर एलिस कॅप्सी आणि नॅट सिव्हर ब्रंट यांनी डाव सावरत संघाचे आठव्या षटकातच अर्धशतक धावफलकावर लावले. कॅप्सीने २५, तर ब्रंटने १६ धावा केल्या. दरम्यान, दिप्ती शर्माने एमी जोन्स आणि फ्रेया कॅम्पला पाठोपाठ बाद करत इंग्लंडची अवस्था ६ बाद ७३ धावा अशी केली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)